पाऊल टाका स्टाईलमध्ये!
आमच्याकडे उपलब्ध पादत्राणांचे प्रकार
पुरुषांसाठी पादत्राणे । महिलांसाठी पादत्राणे । मुलांसाठी पादत्राणे
क्रॉक्स (Crocs), क्लॉग्स स्लायडर्स, फ्लिप-फ्लॉप्स, स्नीकर्स,कॅज्युअल शूज, ब्रँडेड पादत्राणे, फॉर्मल शूज, स्पोर्ट्स शूज, फ्लोटर्स, घरातील वापरासाठी चप्पल, बाहेरील वापरासाठी चप्पल व शूज वरांसाठी (ग्रूम) पादत्राणे वधूसाठी (ब्रायडल) पादत्राणे, मोजडी, कोल्हापुरी चप्पल..
खास मान्सून धमाका! ही जाहिरात दाखवा आणि प्रत्येक खरेदीवर मिळवा १०% सूट!
१००% ओरिजनल लेदर आणि कोल्हापुरी चपला
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
SHOE PALACE
शू पॅलेस
सारडागल्ली,अ.नगर
मो : 9881531536



नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २३.११.२०२६ | अंक नं. १९६ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..

जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी

लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
साई मिडास टच,
नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

92.50 शुध्द चांदीपासुन बनविलेले
खास आपल्या लाडक्या
लहान बालगोपाळांसाठी
चांदीमधील कार्टुन ग्लास, कडली, फुलपात्र, चमचा, ताट, वाटी, बाटली, कडे, पैजण, वाळे, तोडे, मग आणि बरचं काही..

सावेडी मुख्य रस्त्यावरील
दुकान/ऑफिससाठी जागा भाड्याने देणे
सुमारे ३५० स्क्वे.फूट जागा असलेले दुकान, हॉटेल ओबेरॉयसमोर भाड्याने देणे आहे. तसेच तारकपूर मर्चंट्स बँक शाखेच्या दुसऱ्या मजल्यावर १२०० स्क्वे.फूटचा हॉल जागा ऑफिसेस, क्लासेस इ.साठी भाड्याने देणे आहे. प्राईम लोकेशनवरील या जागांसाठी संपर्क साधा.
98 901 45 777

फ्लेक्स बोर्ड लावताना विजेचा शॉक बसून अहिल्यानगर येथील तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

नगर – इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या टेरेस वर फ्लेक्स बोर्ड लावताना तेथून गेलेल्या उच्च दाब वीज वाहिनीला फ्लेक्सचा स्पर्श झाल्याने विजेचा शॉक बसून नगर मधील बोल्हेगाव येथील तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना २२ नोव्हेंबर रोजी दुपारी २.१५ वाजेच्या सुमारास घडली. प्रसाद रतिलाल भंडारी (वय ३४, रा. वृंदावन कॉलनी, कातोरे वस्ती, बोल्हेगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे.


प्रसाद भंडारी (मयत)

प्रसाद हा फ्लेक्स बोर्ड लावण्याचे काम करत होता. एका कंपनीने त्यास नेवासा फाटा (ता.नेवासा) येथे एक फ्लेक्स बोर्ड लावण्याचे काम दिलेले होते. तो आपल्या अन्य दोन साथीदारांसह २२ नोव्हेंबर रोजी दुपारी तेथे गेला होता. एका तीन मजली इमारतीच्या टेरेसवर तिघांनी फ्लेक्स बोर्ड लावला. त्यानंतर त्याचे दोन सहकारी खाली गेले आणि प्रसाद हा तेथेच फ्लेक्स बोर्ड व्यवस्थित बसविण्याचे काम करत होता. त्या इमारती जवळून महावितरण कंपनीची उच्च दाब वीज वाहिनी गेलेली होती.

प्रसाद हा फ्लेक्स व्यवस्थित बसवत असताना वाऱ्याची झुळूक आली आणि त्या फ्लेक्स बोर्डचा वाऱ्यामुळे उच्च दाब वीज वाहिनीला स्पर्श झाला. तो बोर्ड प्रसाद याच्या हातात असल्याने त्याला विजेचा शॉक बसून तो खाली कोसळला. ही बाब त्याच्या अन्य दोन सहकाऱ्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी त्यास तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र तो पर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. तसे डॉक्टरांनी घोषित केले. प्रसाद याच्या मृतदेहाचे नेवासा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. नंतर रात्री नालेगाव अमरधाम मध्ये त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत प्रसाद याच्या पश्चात आई, वडील, पत्नी व २ मुली असा परिवार आहे.

एमआयडीसी परिसरात विजेचा शॉक लागून ढंपर चालकाचा मृत्यू

नगर – ढंपर रिव्हर्स घेत असताना विजेचा शॉक लागून चालकाचा मृत्यू झाल्याची घटना एमआयडीसी परिसरातील शासकीय दूध डेअरी चौक परिसरात घडली. रघुनाथ शंकर सपकाळ (वय ५०, रा. शिंगवे नाईक, ता. अहिल्यानगर) असे मृत चालकाचे नाव आहे.

रघुनाथ सपकाळ हे २१ नोव्हेंबर शासकीय दूध डेअरी चौकातील तलफ पान शॉपच्या मागे ढंपर रिव्हर्स घेत होते. यावेळी त्यांना विजेचा शॉक लागला. या घटनेत ते गंभीररीत्या जखमी झाले. त्यानंतर त्यांचे ओळखीचे अविनाश विठ्ठल वाघ (रा. लोहगाव) यांनी सकाळी १०.४५ वाजता त्यांना उपचारासाठी येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, हॉस्पिटलमध्ये तपासणी केली असता डॉ. संग्राम काळे यांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती दवाखाना ड्यूटी कर्मचाऱ्यांमार्फत एमआयडीसी पोलीस ठाण्याला देण्यात आली. त्यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

७ वे पुण्यस्मरण
सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा आजही दरवळत आहे...

स्व. किसनलाल ईम्रतलाल बुंदेले
स्व. दि. २३/११/२०१९
दादा आपल्या पुण्यस्मरण दिनी विनम्र अभिवादन..
* शोकाकूल *
समस्त स्व. हुकुमचंदजी बुंदेले परिवार
आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र परिवार, अहिल्यानगर.

SONI TILES
Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

लेजर, खतावणी पासून इंटरनेट पर्यंतचे
सुवर्ण महोत्सव
युग हे आधुनिक बँकिंगचे..
जो जे तत्परतेने करेल.. तयाचे...


शहराच्या व्यापार व्यवसायात अर्थपूर्ण वाटा उचलणाऱ्या
मर्चन्टस् बँकेचे संस्थापक श्री. हस्तीमलजी मुनोत,
चेअरमन श्री. संजय चोपडा व सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वृंदाचे
मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा !
सभासदांना रु. ५१००/- भेट पावती देण्यासाठी होणाऱ्या सोहळ्यास आमच्याही शुभकामना !
के. के. शेट्टी
शबरी इंडस्ट्रीयल केटरिंग प्रा. लि.
बिझनेस सेंटर, प्रोफेसर कॉलनी, अहिल्यानगर.
महावीर किडस्
लेडीज अँण्ड किडस् वेअर
मोची गल्ली अहिल्यानगर.
द्वितीय शाखा - डी मार्ट जवळ, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर.
महेंद्र (भैय्या) गंधे * मल्हार गंधे
एम.एम. गंधे अँण्ड कंपनी
सिक्युरिटी अँण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर
प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर.
Dishan

सामाजिक बांधिलकीचा
आरोग्यदायी उपक्रम!
श्री वरी आय फाउंडेशन व स्वस्तिक हॉस्पिटल्स,
विशेष नेत्रसेवा अभियान
निशुल्क नेत्र तपासणी


दररोज सोमवार ते शनिवार
वेळ:
सकाळी 09:00 ते
दुपारी 12:00
मोतीबिंदू शस्त्रक्रिया ₹5500 पासून पुढे
नावनोंदणी आवश्यक! 88620 27777
स्वस्तिक हॉस्पिटल, पुणे फॅशन मागे, कॉटेज कॉर्नर जवळ, अहिल्यानगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन – २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

सत्ताधारी नेत्यांच्या अनधिकृत होर्डिंग्ज फ्लेक्सबाबत अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त शांत का?

नगर – अहिल्यानगर शहरात अनधिकृत जाहिरात फलक, फ्लेक्स आणि होर्डिंग्ज हटविण्याबाबत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव करण्यात आला असताना, शहरात आजही सत्ताधारी राजकीय नेत्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे अनधिकृत बोर्ड सर्रास झळकत आहेत. मग महानगरपालिकेचा ठराव नेमका कोणासाठी? सर्वसामान्य नागरिक आणि विरोधकांच्या बोर्डांवर आयुक्तांनी कारवाई करायची, तर सत्ताधाऱ्यांच्या बोर्डांकडे डोळेझाक का? असा सवाल नितीन भुतारे यांनी उपस्थित केला आहे. यासंदर्भात त्यांनी महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर तीव्र टीका केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रात अधिकृत परवानगी घेतलेले फ्लेक्स आणि जाहिरात फलक वगळता अन्य अनधिकृत बोर्ड हटविण्यात यावेत, तसेच संबंधितांवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करावी, असा ठराव नुकत्याच झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आला. विशेष म्हणजे, शहरातील अनधिकृत बोर्डांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी महानगरपालिकेत केली होती. त्यानंतर प्रशासनाने ठराव मंजूर करून कारवाईची भूमिका घेतली. मात्र, ठरावाला काही दिवस उलटत नाहीत

अनधिकृत होर्डिंग्ज फ्लेक्स लावणाऱ्यांच्या विरोधातील ठराव कशासाठी केला ?



नितीन भुतारे

तोच शहरातील विविध चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी राजकीय नेत्यांचे, सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे तसेच विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने लावलेले फ्लेक्स आणि जाहिरात फलक मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचा ठराव केवळ कागदावरच राहिला आहे का, की त्याची अंमलबजावणी निवडक लोकांपुरतीच केली जात आहे, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

आयुक्तांच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह

नितीन भुतारे यांनी म्हटले आहे की, महानगरपालिकेने अनधिकृत बोर्ड हटविण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असणे अपेक्षित आहे. शहरातील सामान्य नागरिक, व्यापारी किंवा राजकीय विरोधकांनी अनधिकृत फलक लावल्यास प्रशासन तातडीने कारवाई करते. मात्र, सत्ताधारी पक्षातील नेते आणि पदाधिकाऱ्यांचे बोर्ड शहरात लागलेले असतानाही प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे. ही भूमिका प्रशासनाच्या आयुक्तांच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण

शहरातील सार्वजनिक जागा या कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा नेत्याच्या वैयक्तिक मालकीच्या नाहीत. रस्ते, चौक, विद्युत खांब, सार्वजनिक भिंती आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणाऱ्या ठिकाणी अनधिकृत जाहिरात फलक लावणे चुकीचे आहे. अशा फलकांमुळे शहराचे विद्रूपीकरण होत असून, वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अनधिकृत बोर्डांवर कारवाई करताना राजकीय दबावाला बळी न पडता नियम ांची समान अंमलबजावणी करावी, अशी मागणी भुतारे यांनी केली.

अनधिकृत बोर्ड लावणाऱ्यांना कोणाचे अभय

महानगरपालिकेने ठराव केला, प्रशासनाने कारवाईची घोषणा केली, मग शहरात पुन्हा अनधिकृत बोर्ड लावणाऱ्यांना कोणाचा अभय आहे? ठराव करणारेच नियमांचे उल्लंघन करत असतील, तर नागरिकांनी प्रशासनाकडून न्यायाची अपेक्षा तरी कशी करावी? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शहरातील सर्व अनधिकृत फ्लेक्स, होर्डिंग्ज आणि जाहिरात फलक तातडीने हटवावेत, संबंधित बोर्ड लावणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अधिकृत परवानगी असलेल्या फलकांची यादी सार्वजनिक करावी आणि अनधिकृत बोर्ड लावणाऱ्या राजकीय व्यक्तींवरही कोणताही भेदभाव न करता कारवाई करावी, अशी मागणी नितीन भुतारे यांनी केली आहे.

राजकीय सत्तेच्या जोरावर नियमांना बगल

महानगरपालिकेचा ठराव हा केवळ सर्वसामान्यांना नियमांची जाणीव करून देण्यासाठी नसून, तो सत्ताधारी आणि प्रशासनालाही लागू आहे. शहरात नियमांचे राज्य असणार की राजकीय सत्तेच्या जोरावर नियमांना बगल दिली जाणार, हे महानगरपालिका प्रशासनाने आपल्या कारवाईतून स्पष्ट करावे, सत्ताधारी नेते यांच्या अनधिकृत फ्लेक्स होर्डिंग्ज बाबत आयुक्त शांत का असा सवाल नितीन भुतारे यांनी केला आहे आता ठरावानुसार कायदेशीर कारवाई करा असेही त्यांनी पत्रकात म्हटले आहे.

बंद असलेल्या आय क्लिनिकचे कुलूप तोडून साहित्याची चोरी

नगर – शहरातील बाळासाहेब देशपांडे रुग्णालयासमोरील मदनचंद्र आर्केड या इमारतील बंद असलेल्या डॉ. किंनगावकर आय क्लिनिकचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी क्लिनिकमधील विविध साहित्य चोरून नेल्याची घटना २२ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली.

या प्रकरणी अविनाश लक्ष्मीकांत किंनगावकर (वय ४३, रा. आगरकरमळा, स्विटकॉर्नर जवळ, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे वडील दिवंगत डॉ. लक्ष्मीकांत हे नेत्ररोगतज्ज्ञ होते आणि २०२४ मध्ये त्यांचे निधन झाले. वडिलांच्या निधनानंतर हे आय क्लिनिक बंद होते, मात्र फिर्यादी अधूनमधून तेथे जात असत. दोन महिन्यांपूर्वी फिर्यादी यांनी क्लिनिकची पाहणी केली असता सर्व साहित्य व्यवस्थित होते.

२२ नोव्हेंबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजताच्या सुमारास ते क्लिनिकमध्ये गेले असता कुलूप तुटलेले आढळून आले. आत जाऊन पाहणी केली असता क्लिनिकमधील अनेक वस्तू गायब असल्याचे व सामान अस्ताव्यस्त पडल्याचे दिसून आले. परिसरातील इतर खोल्यांमध्ये शोध घेऊनही चोरीस गेलेले साहित्य आढळून आले नाही.

चोरट्याने २२ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. चोरीस गेलेल्या साहित्यात पाच हजार रुपये किमतीचा व्होल्टास कंपनीचा वातानुकूलित यंत्र (एसी) समाविष्ट आहे. तसेच दोन हजार रुपयांचे टेबल, सहा हजार रुपयांचे तीन लाकडी बाक, दोन हजार रुपयांच्या दहा प्लास्टिकच्या खुर्च्या व दीड हजार रुपयांचे एपीसी कंपनीचे वीजपुरवठा यंत्र, याशिवाय एक्साईड कंपनीची बॅटरी, लोखंडी खाट आणि तीन छतावरील पंखे असा मुद्देमाल चोरीस गेला आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सौ. ताराबाई डागा यांचे संथाराव्रतात निधन



नगर – कमलिनी पार्क, गणेशवाडी, स्टेशन रोड येथील रहिवासी सौ. ताराबाई धनराज डागा (वय ८३) यांचे २१ नोव्हेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मार्केटयार्ड येथील व्यापारी किशोर, प्रशांत यांच्या त्या मातोश्री होत.

सौ. सविताबाई गाडेकर यांचे हृदयविकाराने निधन



संगमनेर – दाढबुद्रुक ता.संगमनेर येथील रहिवासी, कडुवस्ती सोनगाव, ता.राहुरी शाळेच्या शिक्षिका सौ. सविताबाई संजय गाडेकर (वय ४९) यांचे २१ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दाढबुद्रुक, राहाता, संगमनेर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. कॅप्टन ठकसेन नाना मेहेत्रे यांच्या त्या मुलगी होत.

सौ.सुशिलाबाई सुर्यवंशी यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील सौ. सुशिला सुर्यवंशी (वय ७०) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी मच्छिंद्र रामभाऊ सुर्यवंशी यांच्या पत्नी, सुनिल व सतिश सुर्यवंशी यांच्या मातोश्री होत.

सुलोचनाबाई धुमाळ यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर – येथील सुलोचना धुमाळ (वय १००) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्वातंत्र्यसेनानी स्व.केरबा भिकाजी धुमाळ यांच्या त्या पत्नी, मधुकर व अनिल धुमाळ यांच्या मातोश्री, बाजारतळ येथील योगेश लोह उद्योगचे मालक प्रशांत धुमाळ, योगेश व सुमित धुमाळ यांच्या आजी होत.

सौ. मिराबाई शिंदे यांचे अल्प अजाराने निधन



श्रीरामपूर – येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका सौ.मिराबाई शिंदे (वय ८२) यांचे अल्प अजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दिर, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. गोंडेगांव, हरेगाव व उंदिरगांव येथील प्राथमिक शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक पोपटराव श्रीपती शिंदे यांच्या पत्नी, श्रीरामपूर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मोहन शिंदे व डॉ.मुकुंद शिंदे यांच्या मातोश्री, डॉ.मनिषा शिंदे व डॉ.आरती शिंदे यांच्या सासूबाई होत.

नरसिंग सोनवणे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीगोंदा – एरंडोली ता. श्रीगोंदा येथील शेतकरी नरसिंग सखाराम सोनवणे (दादा) (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. शेती सोबतच त्यांचे शिक्षणाकडे विशेष लक्ष होते. त्यांची नातवंडे वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात उच्च विद्या विभूषित आहेत. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते ह.भ.प. शोभाताई रणसिंग व भाऊसाहेब सोनवणे यांचे वडील होत.

खासगीकरणाच्या धोरणाविरोधात पाटबंधारे कर्मचाऱ्यांची निदर्शने

नगर– राज्य शासनाच्या जलसंपदा (पाटबंधारे) विभागाने जाहीर केलेल्या सुधारित आकृतिबंधामुळे राज्यातील सुमारे १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर गंडातर आले आहे. महत्त्वाची शासकीय पदे मृत संवर्ग (डेड कॅडर) म्हणून घोषित करून आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून बाह्य यंत्रणेकडून कर्मचारी उपलब्ध करून घेण्याचे धोरण राबविले जात असल्याने शासकीय सेवांच्या खासगीकरणाचा मार्ग मोकळा होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या धोरणाच्या निषेधार्थ २३ नोव्हेंबर रोजी महापालिकेसमोरील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली. शासनाने लादलेला बेकायदेशीर सुधारित आकृतिबंध तातडीने रद्द करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सचिव रावसाहेब निमसे, भाऊसाहेब शिंदे, वैशाली बोडखे, किशोर गांगर्डे, विजय तोडमल, प्रीती पंडित, पल्लवी सोनवणे, मृदुला भोर, अश्विनी कचरे, सोमनाथ पोटे, सोनाली जगधने यांच्यासह पाटबंधारे विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते.

आस्थापनेचा सुधारित आकृतिबंध जाहीर

जलसंपदा विभागाने १९ नोव्हेंबर रोजी आस्थापनेचा सुधारित आकृतिबंध जाहीर केला आहे. यामध्ये खात्यांतर्गत कार्यरत

जलसंपदा विभागातील १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर गंडातर



असलेली कनिष्ठ लिपिक, टंकलेखक, संगणक चालक, वाहनचालक, अनुरेखक, सहायक आरेखक, परिचर, भांडारपाल, सहायक भांडारपाल आदी महत्त्वाची पदे मृत संवर्ग म्हणून घोषित करण्यात आली आहेत. ही पदे दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी अत्यंत आवश्यक असतानाही ती कायमस्वरूपी कमी करण्याच्या निर्णयामुळे सध्या या पदांवर कार्यरत असलेल्या जवळपास १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

नियमित कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार

विभागातील महत्त्वाची पदे मोठ्या प्रमाणात कमी झाल्यास उर्वरित नियमित कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त भार पडणार आहे. सध्या अनेक कर्मचारी सांभाळत असलेली प्रशासकीय आणि तांत्रिक कामे मर्यादित मनुष्यबळावर पूर्ण करावी लागतील. त्यामुळे शासनाची तसेच सर्वसामान्य जनतेची कामे वेळेत आणि नियमानुसार पूर्ण करणे कठीण होणार आहे. याशिवाय कार्यरत कर्मचाऱ्यांना भविष्यात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होण्यावरही मर्यादा येणार आहेत. परिणामी, ज्या पदावर मूळ नियुक्ती झाली आहे, त्याच पदावरून सेवानिवृत्त होण्याची वेळ कर्मचाऱ्यांवर येण्याची शक्यता आहे.

नव्याने भरती होण्याचे मार्ग बंद होतील

शासनाच्या या निर्णयामुळे सुमारे १५ ते २० हजार नियमित पदे कायमस्वरूपी कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी, भविष्यात या पदांवर नव्याने भरती होण्याचे मार्ग बंद होतील. त्यामुळे सुशिक्षित तरुणांसाठी उपलब्ध होणाऱ्या शासकीय नोकरीच्या संधी कमी होऊन बेरोजगारीचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. आधीच बेरोजगारीचा सामना करणाऱ्या तरुणांमध्ये यामुळे असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारे आणि खासगीकरणाला प्रोत्साहन देणारे हे धोरण म्हणजे कर्मचाऱ्यांना वेठबिगारीच्या दिशेने ढकलण्याचा प्रयत्न असल्याची टीका राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने केली आहे. या धोरणाला संघटनेचा विरोध असून, सुधारित आकृतिबंध तातडीने रद्द करून पूर्वीप्रमाणे नियमित पदे कायम ठेवावीत, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.





महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे दिवाळी सण अग्रीम तसेच सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक थकीत देणी तातडीने अदा करावीत, या मागणीसाठी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. (छायाचित्र : लहू दळवी)

१३० कोटींच्या थकीत देण्यांसह 'सण अग्रीम'साठी महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन सुरू

आयुक्त यशवंत डांगे यांच्यासोबतची बैठक निष्फळ; कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे दिवाळी सण अग्रीम तसेच सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक थकीत देणी तातडीने अदा करावीत, या मागणीसाठी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने २३ नोव्हेंबरपासून धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या प्रश्नांबाबत कामगार युनियनने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर आयुक्तांसोबत बैठकही झाली; मात्र या बैठकीत कोणतीही सकारात्मक चर्चा न झाल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. या आंदोलनामुळे महापालिकेचे कामकाज ठप्प झाले आहे.

महाराष्ट्रातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये तसेच महानगरपालिकांमध्ये कर्मचाऱ्यांना दिवाळी सणापूर्वी सण अग्रीम दिले जाते. मात्र, अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाकडून यंदा दिवाळी सण होऊनही कर्मचाऱ्यांना अद्याप सण अग्रीम देण्यात आलेले नाही. याशिवाय कर्मचाऱ्यांची सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम थकीत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधात मोठी नाराजी निर्माण झाली आहे.

निवडणुकीतील कामाचा मोबादलाही दिला नाही

कर्मचारी नियमित कामकाजाबरोबरच जनगणना, एसआयआर आणि निवडणुकीसारखी अतिरिक्त जबाबदारीही प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. महापालिका निवडणूक प्रक्रियेतही कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, निवडणुकीच्या कामाचा मोबदला अद्याप महापालिका कर्मचाऱ्यांना मिळालेला नाही. दुसरीकडे, महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना निवडणुकीतील कामाचा मोबदला महापालिकेने दिला आहे. त्यामुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत असल्याचे युनियनच्या वतीने सांगण्यात आले.

कर्मचाऱ्यांचे वेतनही वेळेवर होत नाही

राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान वेळेवर प्राप्त होत नसल्यास कर्मचाऱ्यांचे वेतनही वेळेवर होत नाही. एकीकडे कर्मचारी नियमित कामकाजासह अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांच्या हक्काची देणी आणि सण अग्रीम मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना युनियनने व्यक्त केली. कामगार युनियनचे सचिव आनंदराव वायकर म्हणाले की, महापालिकेतील कर्मचारी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. नियमित काम काजासोबतच जनगणना, एसआयआर आणि निवडणुकीची अतिरिक्त कामेही कर्मचारी करतात. मात्र, त्यांच्या हक्काची थकीत देणी आणि दिवाळी सण अग्रीम अद्याप मिळालेले नाही.

महापालिकेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम

महापालिकेत काही जण तुपाशी आणि कर्मचारी उपाशी, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आयुक्त यशवंत डांगे यांच्यासोबत बैठक होऊनही सकारात्मक तोडगा निघालेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत कर्मचाऱ्यांचे सर्व प्रश्न मार्गी लागत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील, असा इशारा वायकर यांनी दिला. या आंदोलनावेळी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सरचिटणीस आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, महादेव कोतकर, अजय सौदे, उपाध्यक्ष अमोल लहारे, सतीश ताठे, बैजू साठे, बाळासाहेब व्यापारी यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केल्यामुळे महापालिकेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला असून कामकाज ठप्प झाले आहे.

अर्बन बँकेच्या ठेवीदारांची २६ नोव्हेंबर रोजी बैठक

नगर – नगर अर्बन बँक बचाव संघर्ष समितीच्या वतीने अर्बन बँकेच्या ठेवीदारांची बैठक २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता महाजन गल्लीतील गायत्री मंदिरात आयोजित करण्यात आल्याची माहिती डि. एम. कुलकर्णी यांनी दिली.

बैठकीत ॲड. अच्युतराव पिंगळे हे महत्त्वाची माहिती देणार असून समितीचे अध्यक्ष राजेंद्र गांधी हेही या बैठकीस उपस्थित राहणार आहेत. नगर शहर, तालुका, जिल्हा व जिल्ह्याबाहेरील ठेवीदारांनी या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नगर अर्बन मल्टी-स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेत सुमारे २९१ कोटी रुपयांचा आर्थिक घोटाळा झाल्याचे तपासात समोर आले होते. ठेवीदारांच्या हितासाठी महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंरक्षण कायद्यांतर्गत २८ आरोपींच्या १०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या ७२ मालमत्ता जप्त करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. परंतु अद्यापही ठेवीदारांचे पैसे परत मिळालेले नाहीत. यात काही संचालकांना अटकही झाली आहे.

गजराजनगर परिसरात तलवारीसह तरूणाला पकडले

नगर – शहराच्या उपनगरी भागातील गजराजनगर परिसरात वारूळवाडी रोडवरील स्वरा हॉटेलजवळ धारदार तलवार बाळगणाऱ्या तरूणाविरूध्द एमआयडीसी पोलिसांनी कारवाई केली. ताजुद्दीन रूस्तुम सय्यद (रा. गजराजनगर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरूणाचे नाव आहे.

त्याच्याकडून सुमारे दोन हजार रूपये किमतीची धारदार तलवार जप्त करण्यात आली. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास वारूळवाडी रोडवरील स्वरा हॉटेलजवळ ताजुद्दीन सय्यद हा त्याच्या राहत्या घरासमोर धारदार तलवार बाळगत असल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आली.

पोलिसांनी तात्काळ कारवाई करून त्याच्याकडील तलवार जप्त केली.

याप्रकरणी पोलीस अंमलदार दीपक फुंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात ताजुद्दीन सय्यद याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गृहिणी

आरोग्य

हिवाळ्यातील सांधेदुखीवर घरगुती उपाय

हिवाळा सुरू झाला की, थंडी वाढते आणि त्यामुळे सांध्यांमधील वंगण कमी होऊन सांधे आखडतात, दुखू लागतात आणि चालताना, उठताना, बसताना खूप त्रास होतो. हा त्रास कमी करण्यासाठी, सकाळी उठल्यावर लगेच थंड पाण्याला हात लावू नये. कोमट पाण्याने तोंड धुवावे आणि कोमट पाणी प्यावे. सकाळच्या कोवळ्या उन्हात थोडा वेळ बसल्याने, सांध्यांना ऊब मिळते आणि दुखणे कमी होते. रोज थोडा वेळ चालावे, हात, पाय, मान, कंबर यांचे हलके व्यायाम करावेत. जास्त वेळ एकाच जागी बसून राहू नये, मधून मधून उठून फिरावे. मोहरीचे तेल, तिळाचे तेल किंवा एरंडेल तेल कोमट करून, सांध्यांना हळूवारपणे चोळावे. त्यानंतर, गरम पाण्याच्या पिशवीने किंवा गरम कापडाने शेक द्यावा. यामुळे रक्ताभिसरण वाढते आणि आखडलेले सांधे मोकळे होतात. रात्री झोपताना, हळद घातलेले गरम दूध प्यावे. आहारात मेथीचे दाणे भिजवून खावेत, लसूण, आले, गूळ, तीळ, जवस, नाचणी, बाजरी, तूप आणि गरम पदार्थांचा वापर करावा. थंड दही, थंड पाणी, बर्फाचे पदार्थ आणि तेलकट पदार्थ टाळावेत. उबदार कपडे घालावेत, गुडघे, कोपर आणि पाय थंडीपासून झाकून ठेवावेत. थंड वाऱ्यात जास्त वेळ फिरू नये, जड वजन उचलू नये आणि जिना चढताना घाई करू नये. झोपताना पायाखाली उशी ठेवावी आणि आरामदायक अंथरुणावर झोपावे. मन शांत ठेवावे, चिंता कमी करावी आणि रोज पुरेशी झोप घ्यावी. हे सर्व उपाय नियमितपणे केले तर, हिवाळ्यातील सांधेदुखीचा त्रास बराच कमी होतो आणि शरीर हलके वाटू लागते.

पाककला

पालक पनीर

साहित्य : पालक २ जुड्या, पनीर २०० ग्रॅम, कांदा २ मध्यम, टोमॅटो २ मध्यम, आले १ इंच, लसूण ६-७ पाकळ्या, हिरवी मिरची २, जिरे १ चमचा, हळद १/२ चमचा, गरम मसाला १ चमचा, धने पावडर १ चमचा, क्रीम किंवा मलई २ चमचे, तूप किंवा तेल २ चमचे, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

कृती : पालक स्वच्छ धुवून घ्या. पातेल्यात पाणी गरम करून त्यात पालक २ मिनिटे उकळून घ्या. लगेच थंड पाण्यात टाका आणि मिक्सरमध्ये हिरवी मिरची, आले, लसूण घालून बारीक वाटून घ्या. कढईत तूप गरम करून त्यात जिरे घाला. जिरे तडतडल्यावर बारीक चिरलेला कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परता. त्यात बारीक चिरलेला टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात हळद, धने पावडर, गरम मसाला आणि मीठ घालून एकजीव करा. आता त्यात वाटलेली पालक पेस्ट घालून ५-६ मिनिटे मध्यम आचेवर शिजवा. त्यात पनीरचे चौकोनी तुकडे घालून हलक्या हाताने मिक्स करा. वरून क्रीम किंवा मलई घालून एकजीव करा. तयार पालक पनीर कोथिंबीर घालून गरम पोळी, भाकरी किंवा भाताबरोबर सर्व्ह करा.

वास्तू

अभ्यास करण्याची दिशा

* मुलांच्या अभ्यासाची खोली नेहमी पूर्व किंवा ईशान्य दिशेला असावी आणि अभ्यास करताना मुलांचे तोंड पूर्वेला किंवा उत्तरेला असावे. यामुळे एकाग्रता वाढते आणि बुद्धी तल्लख होते.
* अभ्यासाच्या टेबलावर सरस्वतीचा फोटो आणि क्रिस्टलचा ग्लोब ठेवल्याने मुलांना यश मिळते.
* तुळशीचे रोप नेहमी घराच्या उत्तर किंवा ईशान्य दिशेला किंवा मुख्य दरवाजा समोर लावावे, यामुळे घरात पवित्रता राहते.

सौंदर्य

* पपईचा गर चेहऱ्यावर पंधरा मिनिटे ठेवल्यास त्वचा मऊ होते.
* जास्त गरम पाण्याने केस धुवू नयेत, केस कोरडे होतात.
* काकडीचे काप डोळ्यांवर ठेवल्याने डोळ्यांचा थकवा जातो.

सल्ला

* कोथिंबीर जास्त दिवस ताजी ठेवण्यासाठी पेपरमध्ये गुंडाळून डब्यात ठेवा.
* लिंबू सुकू नये म्हणून मिठाच्या बरणीत ठेवा.
* कांदे आणि बटाटे एकत्र ठेवू नका.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२६

त्रिपुरारि पौर्णिमा, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, कृत्तिका २३।२५, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : आज तुमचे मन कमकुवत होईल.

वृषभ : मालमत्ताविषयक कामे होतील आणि उत्तमपैकी नफा होईल.

मिथुन : आज तुम्ही करमणुकीत रमाल. मैदानावरील स्पर्धेमध्ये सहभागी व्हाल.

कर्क : तुमच्या हातातून पैसे हरवतील. कौटुंबिक गरजांवर लक्ष केंद्रीत कराल.

सिंह : आपल्या आत्मविश्वासाला अपेक्षांची जोड मिळेल.

कन्या : आर्थिक दृष्ट्या आघाडीवर असाल. महत्त्वाची खरेदी कराल.

तूळ : आजच्या दिवशी तुम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का बसेल.

वृश्चिक : मागील उधारी उसनवारी वसूल होईल.

धनु : आशावादी रहाल आणि चांगल्या उजळ बाजूकडे लक्ष द्याल.

मकर : आज तुमच्याजवळील उत्तम संकल्पनांमुळे अपनेक्षीत फायदा होईल.

कुंभ : जोडीदाराकडून सहकार्य मिळेल. सहवास लाभेल.

मीन : काल्पनिक चिंता सोडून द्याल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

शब्दगंध क्र. ७५६१ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) पदार्थातील अणू किंवा सूक्ष्म कण एकमेकांपासून वेगळे होण्याची क्रिया ४) सवय; अभ्यास ७) उंच उडणारा एक पक्षी ८) स्वतःला उलटे टांगून घेणारा एक पक्षी १०) टोळी; टीम ११) सकस; सत्त्वयुक्त १३) कुटण्यासाठी तयार केलेला दगडाचा खळगा १४) उग्र वास १५) परेशान; त्रस्त १६) दणकट; मजबूत; बळकट १८) गुंतागुंत १९) दैव; प्रारब्ध; प्राक्तन २०) लहान मुलाचे एक टोपणनाव

उभे शब्द :- १) घात करणारे; हानिकारक २) निवासस्थान; गेह; गृह ३) अलीकडचा; ताजा ४) एक अधिक पाव ५) एक पक्षी; रावा; कीर; पोपट ६) अळ्या वगैरेंची एकाच जागी होणारी एकसारखी हालचाल ९) एकसारखे एकीकडेच पाहणे; एकाग्र दृष्टी १०) पाय ठेवणे; प्रवेश १२) पुरुषाचा अंगरखा; शर्ट वगैरे १३) खट्याळ; खुशालचंद; भटक्या; गावगुंड १५) पशू; जनावर १६) केस काळे करण्याचे रसायन १७) एक स्थितिस्थापक पदार्थ ज्याच्यापासून टायर, ट्यूब वगैरे वस्तू तयार केल्या जातात

शब्दगंध क्र. ७५६० चे उत्तर

दे	शां	त	र	■	हो	■	अं
व	त	न	■	चे	रा	पुं	जी
की	■	म	सा	ला	■	गी	र
■	क	णी	स	■	स	■	■
म	ला	■	रा	व	सा	हे	ब
क	ल	प	■	ख	■	ल	ड
रं	■	सं	भ	व	■	पा	गा
द	दा	त	■	ख	रा	टा	■

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : आयुष्य खूप सुंदर आहे, फक्त ते जगता आले पाहिजे.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

आकाश निळ्या रंगाचे का दिसते?

दिवसा आपल्याला आकाश निळ्या रंगाचे दिसते याचे मुख्य कारण म्हणजे सूर्यप्रकाश आणि पृथ्वीभोवती असलेली हवा. सूर्यप्रकाश वरून पांढरा दिसत असला तरी त्यात तांबडा, केशरी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा आणि जांभळा असे सात रंग लपलेले असतात. हे आपण पावसाळ्यात इंद्रधनुष्य पाहतो तेव्हा सहज लक्षात येते. जेव्हा पावसाचे थेंब आणि सूर्यप्रकाश एकत्र येतात तेव्हा पांढरा प्रकाश सात रंगात विभागला जातो. त्याचप्रमाणे जेव्हा सूर्यप्रकाश पृथ्वीच्या वातावरणात शिरतो तेव्हा हवेतील अतिशय बारीक धुळीचे कण, पाण्याचे बारीक थेंब आणि वायूंच्या कणांवर आदळून सगळीकडे विखुरला जातो. या विखुरण्याच्या प्रक्रियेत निळ्या आणि जांभळ्या रंगाचा प्रकाश इतर रंगांपेक्षा जास्त विखुरला जातो कारण त्याची तरंगलांबी कमी असते आणि तो हवेच्या कणांवर जास्त आदळतो. तांबडा प्रकाश जास्त लांबपर्यंत सरळ जातो पण निळा प्रकाश लहान लहान कणांवर आदळून सगळीकडे पसरतो. जरी जांभळा रंग निळ्यापेक्षा जास्त विखुरला जात असला तरी आपले डोळे निळ्या रंगाला जास्त संवेदनशील असतात आणि वातावरणातच बराचसा जांभळा प्रकाश शोषला जातो.

त्यामुळे विखुरलेला निळा प्रकाश सगळीकडे पसरतो आणि आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचतो. म्हणूनच आपल्याला संपूर्ण आकाश निळे दिसते. जर पृथ्वीभोवती हवा नसती तर दिवसाही आकाश काळे दिसले असते जसे चंद्रावरून दिसते. कारण चंद्रावर हवा नाही, त्यामुळे तिथे प्रकाश विखुरला जात नाही आणि आकाश नेहमी काळे दिसते. त्याचप्रमाणे जेव्हा विमान खूप उंचावर जाते तेव्हा तिथे हवा विरळ असते, त्यामुळे आकाश जास्त गडद निळे आणि काळपट दिसू लागते. उंच पर्वतावरूनही आकाश जास्त गडद निळे दिसते कारण तिथे हवा कमी असते. सकाळी आणि संध्याकाळी सूर्य क्षितिजाजवळ असतो तेव्हा सूर्यप्रकाशाला वातावरणातून जास्त लांबचा प्रवास करावा लागतो. त्यावेळी निळा प्रकाश वाटेतच पूर्णपणे विखुरला जाऊन निघून जातो आणि कमी विखुरला जाणारा

तांबडा आणि केशरी रंगच आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचतो. म्हणूनच सकाळी आणि संध्याकाळी आकाश तांबूस आणि केशरी दिसते. पावसाळ्यात ढग पांढरे दिसतात कारण ढगांमधील पाण्याचे थेंब मोठे असतात आणि ते सर्व रंग सारख्याच प्रमाणात विखुरतात. त्यामुळे ढग पांढरे दिसतात. जेव्हा ढग खूप दाट होतात तेव्हा त्यातून प्रकाश आरपार जाऊ शकत नाही आणि ढग काळे दिसू लागतात. समुद्राचे पाणीही निळे दिसण्यामागे हेच कारण आहे.

समुद्राचे पाणी निळा प्रकाश जास्त परावर्तित करते आणि तांबडा प्रकाश शोषून घेते. लांबून डोंगरही निळसर दिसतात कारण मधल्या हवेत निळा प्रकाश विखुरलेला असतो. प्रदूषण जास्त असलेल्या शहरात आकाश थोडे पांढरट आणि धुरकट दिसते कारण तिथे धुळीचे आणि धुराचे कण जास्त असतात. त्या कणांवर सर्व रंग विखुरले जातात. स्वच्छ गावाकडील आकाश मात्र जास्त गडद निळे दिसते कारण तिथे हवा स्वच्छ असते. अशा प्रकारे सूर्यप्रकाशाचे विखुरणे, हवेतील कण आणि आपल्या डोळ्यांची रचना या तिन्ही गोष्टींमुळे आपल्याला आकाश निळे दिसते. हे निसर्गाचे एक अतिशय सुंदर आणि शास्त्रीय उदाहरण आहे.

आई वडिलांचा आदर

एकदा एका गावात रमेश नावाचा मुलगा राहत होता. त्याचे आई वडील खूप गरीब होते. ते दिवसभर शेतात कष्ट करायचे आणि रमेशला शिकवायचे. रमेश हुशार होता पण त्याला आई वडिलांची लाज वाटायची. त्याचे कपडे फाटके असायचे आणि त्याचे आई वडील साधे असायचे म्हणून तो शाळेत त्यांच्याशी नीट बोलत नसे. एके दिवशी शाळेत पालकांची सभा होती. सगळ्या मुलांचे आई वडील छान कपडे घालून आले होते. रमेशचे आई वडील मात्र मळके कपडे घालून आले. हे पाहून रमेशला खूप राग आला.

तो त्यांच्याकडे पाहून म्हणाला, तुम्ही इथे का आलात, तुम्हाला इथे यायला कोणी सांगितले. हे ऐकून त्याच्या आईच्या डोळ्यात पाणी आले पण ती काहीच बोलली नाही. वडिलांनी हळूच त्याच्या डोक्यावर हात ठेवला आणि बाजूला जाऊन बसले. सभेत शिक्षकांनी रमेशचे खूप कौतुक केले.

ते म्हणाले, रमेश खूप हुशार आहे, त्याचे आई वडील दिवस रात्र कष्ट करून त्याला शिकवतात. त्यांचे त्याग खूप मोठे आहेत. हे ऐकून रमेशला आपली चूक कळली. त्याला आठवले की आईने स्वतः उपाशी राहून त्याला जेवू घातले होते. वडिलांनी स्वतःचे फाटके कपडे शिवून घातले होते पण त्याला मात्र नवीन कपडे घेतले होते. त्याच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले. तो धावत जाऊन आई वडिलांच्या पाया पडला आणि म्हणाला, मला माफ करा, मी तुमचा अपमान केला. तेव्हापासून रमेश आई वडिलांचा खूप आदर करू लागला. तो त्यांची प्रत्येक गोष्ट ऐकू लागला आणि त्यांना कधीही दुखवणार नाही अशी शपथ घेतली.

बोध : आई वडील हेच आपले खरे दैवत असतात. त्यांनी केलेल्या त्यागाची किंमत पैशात मोजता येत नाही. म्हणून आपण नेहमी आई वडिलांचा आदर केला पाहिज.

आत्मशक्ति



ह्या घडामोडींचा बदला आपण कोणत्या प्रकारे घ्यावा ह्याच विचारात आपला बहुतेक वेळ जातो. हा त्रास दूर करावा ह्याबाबत आपण ठरवितो, विचार करीत असतो की ह्या घटनेपासून पुढील वेळी आपले संरक्षण कसे करावे. आमचा मूल्यवान वेळ भजन अभ्यासात न घालवता अशा विचारातच तो वाया घालवितो की मला क्रोध कसा आला किंवा ह्यावर उपाय काय करावा?अहिंसक मार्गाने आम्ही क्रोध संपवू शकतो. आम्हाला अस्वस्थ करणाऱ्या अशा बहुतेक परिस्थितीतून आम्ही रोज जातो.

घटना आमच्या मनाप्रमाणे घडत नाहीत.

अध्यात्मिक शक्ती

आमच्या इच्छेप्रमाणे लोक वागत नाहीत. ते अशा रीतीने बोलतात की त्यामुळे आम्हाला दुःख होते. क्रोधाच्या प्रतिक्रियेत आमच्या भावना उद्दीपित होतात. आपण म्हणतो, मी तुला पाहून घेईल वा तू माझे काय करणार आहेस? आणि हे चक्र न थांबता चालूच राहते. अशावेळी मनावर संयम बाळगण्यात आणि रागावर वेगळ्या प्रकारे प्रतिक्रिया करण्याची जरूरी असते. हे काम कठीण आहे. परंतु अशक्य मात्र नाही. येशू ख्रिस्तांनी म्हटले आहे,ज्याने तुझ्या गालावर थापड मारली, त्याच्यापुढे दुसरा गाल कर! (लूका ६:२९)महात्मा गांधींनी अहिंसेद्वारा भारतास स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत केली. नागरिक हक्कांचा अधिकार मिळावा म्हणून अमेरिकेत डॉ. मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनिअर) ह्यांनी आंदोलनाचे नेतृत्व अहिंसक मार्गाने केले. सर्वजणांना माहिती आहे की हिंसेने हिंसा वाढते. माणुसकी व शांततेने भरपूर भरलेले हे जग पहावयाचे असेल तर फक्त अहिंसेचाच मार्ग अवलंबिला पाहिजे.आम्ही क्रोधाचे समाधान, त्यावर उपाय अनेक मार्गाने करू शकतो. क्रोधापासून होणाऱ्या नुकसानीकडे पहाणे हा एक मार्ग आहे. आम्ही आमचे लक्ष्य निश्चित करावे व बघावे की आमचे लक्ष्य साधण्यात किती अडचणी येतात. हे पहाणे दुसरा मार्ग होय. ध्यानाभ्यास करून क्रोध संपविणे हा तिसरा मार्ग होय.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : बरोबर.

शिवानीदीदी :

त्याचप्रमाणे, ज्या आत्म्यांबरोबर माझं कार्मिक खातं आहे तेदेखील माझ्या आयुष्यात त्यांचा हिशोब पूर्ण करण्यासाठी येतील आणि माझे विचार आपोआपच त्या दिशेने जातील. माझ्या कार्मिक खात्यानुसार, वर्तमानात मला जे काम करावंच लागणार आहे त्याची गुणवत्ता बरोबर आहे की नाही याची मला काळजी घ्यायची आहे. समजा, मला एखाद्याला मदत करायची नाहीये पण तरी मी त्या दिशेने ओढली जात आहे. तरीसुद्धा मला हे माहीत असायला हवं की ते चांगलं कर्म आहे. याउलट, जर एखादं वाईट काम करण्याकडे मी ओढली जात असेन तर, मी कोणत्याही नकारात्मक कर्माकडे आकर्षित होऊ नये म्हणून मी स्वतःला थांबवायला हवं. त्या क्षणी मला माझी सकारात्मक कर्म माझ्या पूर्व कार्मिक खात्यावर वरचढ व्हावीत म्हणून इच्छाशक्ती वापरावी लागेल.

नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय :

जर मी चांगलं कर्म करूनही मला त्याबदल्यात नकारात्मकता मिळत असेल तर? उदाहरणार्थ, मी माझ्या मित्राला त्याच्या आयुष्याचा जोडीदार शोधण्यासाठी मदत केली होती पण ते जोडपं सतत भांडत राहतं. मला अपराधी वाटलं.

शिवानीदीदी :

तुमच्या कर्माचा हेतू चांगला होता. तुम्हाला त्याला मदत करायची होती. त्यानंतर जे काही घडलं तो त्या जोडप्याच्या निर्णयांचा परिणाम होता.

सुरेश ओबेरॉय : त्यांनी एकत्र यावं म्हणून मी त्यांना खूप समजावलं पण नंतर त्यांनी घटस्फोट घेतला. त्यामुळे मीही त्या कार्मिक खात्यामध्ये गुंतलो गेलो. कधीकधी आपण इतरांना मदत करायचा प्रयत्न करतो, पण ते चुकूही शकतं.

शिवानीदीदी : एक गोष्ट नक्की आहे की, त्या दोन आत्म्यांचं – ज्यांनी लग्न केलं आणि नंतर घटस्फोट घेतला – त्यांना आपापसांत कर्माचा हिशोब पूर्ण करायचा होता. त्यामुळे ते घडणारच होतं. पण यातून तुम्ही हे शिकू शकता की, इतरांसाठी कधीही तुम्ही निर्णय घेऊ नका, तुमच्या मुलांसाठीही नाही. सर्वसाधारणपणे, सगळ्या पालकांना असं वाटतं की, त्यांच्या मुलांसाठी काय चांगलं ते त्यांना माहीत आहे. त्यांचा हेतू चांगला असेलही कदाचित पण त्यांना ते त्यांच्या क्षमतेच्या आणि संस्कारांच्या भिंगातून म्हणजेच त्यांच्या दृष्टिकोनातून बरोबर वाटतं.

सुरेश ओबेरॉय : स्वाभाविकतः पालक त्यांच्या समजेप्रमाणे आणि त्यांनी घातलेल्या चष्म्यातून जे दिसतं त्यानुसारच ठरवतात.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, तुम्ही मला कधी फिरायला नेत नाही.
नवरा : नेतो ना, रोज स्वप्नात नेतो.
बायको : स्वप्नात कशाला? खरं फिरायला न्या.
नवरा : अगं, स्वप्नात पेट्रोल लागत नाही ना!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात लहान देश कोणता?

– व्हॅटिकन सिटी

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

३) मंजिष्ठा : गर्भाची त्वचा निरोगी, कांतियुक्त तयार होण्यास मदत होते.

४) धमासा : बाळाचे स्पंदन सुरू होण्यास आणि उद्युक्त करण्यास मदत करते.पाचवा महिना : गर्भाचे अवयव अधिक स्पष्टपणे दिसू लागतात. यामध्ये गर्भाचे सर्व स्रोतसे तयार झालेले असतात.

१) शिंगणी व डोरली: गर्भाभोवती असणारे गर्भोदक योग्य प्रमाणात राहण्यास मदत करते.

२) वटांकुर व वटसाल : गर्भपात होऊ नये म्हणून उपयोगी पडते.

सहावा महिना : या महिन्यामध्ये गर्भ मन व बुद्धीने तयार होतो.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१) पिठवण : गर्भाची, मेंदूची व बुद्धीची वाढ चांगली होते.

२) गोक्षुर : गर्भाचे स्नायू, हाडे मजबूत करण्यासाठी मदत होते.

पाळीची तारीख चुकल्यानंतर पहिल्या आठ दिवसांमध्ये गर्भधारणा तपासणी सकारात्मक येते. याच काळात – पाळीची तारीख चुकल्यानंतर – वैद्यांकडे जाऊन यावे. कोणता आहार घ्यावा, कोणती योगासने करावीत याबद्दलचे मार्गदर्शन घ्यावे. बऱ्याच जणींना दुसऱ्या महिन्यामध्ये उलट्यांचा त्रास होत राहतो. पाणीदेखील पचत नाही. याची कल्पना वैद्यांना देऊन त्या पद्धतीने औषधे घ्यावीत; परंतु औषध घेऊन देखील काही जणींना उलटी व मळमळीचा त्रास होत असतो. त्याकरिता काही पथ्ये पाळण्याची गरज असते.उदा. : रात्रीच्या जेवणानंतर जवळजवळ सात-आठ तास पोट रिकामे असते; त्यामुळे सहाजिकच जठरामध्ये पित्त साचते व सकाळी उठल्यावर नेहमीच्या सवयीने चहा प्यायला जातो.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

स्वच्छ भारत-स्वस्थ भारत या अभियानात प्रत्येकाने सहभागी व्हावे

डॉ. सुधा कांकरिया

नगर – स्वच्छता हीच निरोगी आरोग्याची गुरूकिल्ली आहे. वैयक्तीक तसेच सार्वजनिक स्वच्छतेबरोबर पर्यटन स्थळाची तसेच तीर्थक्षेत्राच्या स्वच्छतेचीही जबाबदारी नागरिकांवर आहे. सर्वांनी स्वच्छ भारत – स्वस्थ भारत या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन स्वच्छतादूत डॉ. सुधा कांकरिया यांनी केले. रोटरी क्लब अहिल्यानगर आयोजित स्वच्छतेविषयीच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरचे अध्यक्ष सुहास क्षीरसागर, तसेच माजी अध्यक्ष नितीन थाडे, सचिव संदीप ठोंबे व मिनल संगमकर उपस्थित होते.



चांदबीबी महाल परिसर स्वच्छतेसाठी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर व मानकन्हैय्या ट्रस्ट यांच्यावतीने सहा मोठे डस्टबीन देण्यात आले. यावेळी स्वच्छतादूत डॉ. सुधा कांकरिया, सुहास क्षीरसागर, नितीन थाडे, संदीप ठोंबे, सागर चंद्रकांत दाणे, मिनल संगमकर आदी उपस्थित होते.

चांदबिबी महालाची स्वच्छता राखण्याचे स्वच्छतादूत म्हणून केले आवाहन

अहिल्यानगर येथील चांदबिबीचा महल हे एक उत्तम पर्यटन क्षेत्र आहे. नगरची शान व मानबिंदू आहे. इथे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन तसेच परराज्यातुनही पर्यटक मोठ्या संख्येने येतात. या पर्यटन क्षेत्राची स्वच्छता ही आपली जबाबदारी आहे. येथील परिसर स्वच्छ रहावा यासाठी सागर चंद्रकांत दाणे हे प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्र पोलिस अंतर्गत चांदबिबी पुनःप्रक्षेपण केंद्र येथे ते आपली ड्युटी करता करता स्वच्छते विषयीही महत्वपुर्ण कार्य करतात. यासाठी रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर व मानकन्हैय्या ट्रस्ट द्वारे त्यांचा सन्मान रोटरीचे अध्यक्ष सुहास क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला व स्वच्छतादूत डॉ. कांकरिया यांच्या हस्ते सहा मोठे डस्टबीन त्यांना भेट म्हणून देण्यात आले.

याचा उपयोग परिसराची स्वच्छता राखण्यासाठी होणार आहे. स्वच्छता हीच सेवा आहे, प्रत्येक नागरिकांनी स्वच्छतेची जबाबदारी घेऊन एक पाऊल स्वच्छतेकडे टाकणे आवश्यक आहे. कचरा कुंडीत टाकणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, सांडपाण्याचे व्यवस्थित नियोजन करणे हे महत्वाचे आहे. घर परिसर स्वच्छ राहिला तर आरोग्य उत्तम राहणार आहे. औषध पाण्यावरही खर्च वाचणार आहे व जीवन अधिक निरोगी व आनंदी होणार आहे. तरी सर्वांनी स्वच्छ भारत अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करीत डॉ. कांकरिया यांनी उपस्थित पर्यटकांना स्वच्छतेविषयीची शपथ देण्यात आली.

मीनल संगमकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष सुहास क्षीरसागर यांनी स्वागत केले. सचिव संदीप ठोंबे यांनी आभार मानले.

नगर शहरामध्ये ९, १० व ११ डिसेंबर रोजी मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन


स्व. डॉ. शरदकुमार दीक्षित


स्व. चांदमल मुनोत

नगर – भारतीय जैन संघटना (अहिल्यानगर), भारतीय जैन संघटना (अहिल्यानगर), चांदमल मुनोत (नेवासकर) पब्लिक ट्रस्ट आणि जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने ९, १० व ११ डिसेंबर रोजी जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल), आयुष रुग्णालय येथे मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यात सुमारे १५० रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करणार असल्याची माहिती चांदमल मुनोत ट्रस्टचे ट्रस्टी किशोर मुनोत व भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आदेश चंगेडिया यांनी दिली. जिल्हा रुग्णालयची सर्व टीम या शिबिरासाठी तत्पर आहे असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे व जिल्हा अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ. सुचेता यादव यांनी सांगितले.

गेल्या २५ वर्षांपासून या उपक्रमातून हजारो रुग्णांनी लाभ घेतला आहे. प्लॅस्टिक सर्जरी ही खर्चिक असल्याने अहिल्यानगरसह शेजारील जिल्ह्यांतील अनेक गरजू रुग्ण या शिबिराचा लाभ घेतात. स्व. पद्मश्री डॉ. शरदकुमार दिक्षित (अमेरिका) यांच्या स्मरणार्थ त्यांचे शिष्य डॉ. राज लाला व सौ. ललिता लाला हे दरवर्षी अमेरिकेतून नगरला येऊन या उपक्रमात सहभाग घेतात. डॉ उज्वल भावसार (सूरत) तसेच सौ. प्रीतम राका, डॉ. नूतन फिरोदिया, डॉ. दीपा भळगट, डॉ. मृदुला मुळे यांचेही या शिबिरासाठी योगदान असणार आहे. शिबिर प्रमुख म्हणून प्रशांत गांधी, शशिकांत मुनोत व अरुण दुगड काम पाहत आहेत.

या शिबिरात प्रामुख्याने दुभंगलेले ओठ, चेहऱ्यावरील विद्रूप वर्ण/डाग, नाक व कानावरील बाह्य व्यंग, पापण्यांतील विकृती अशा महागड्या व सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरील शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. नोंदणी व प्राथमिक तपासणी फक्त ९ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेतच होईल. यानंतर उर्वरित वेळेत शस्त्रक्रिया पार पडतील. जळालेले, भाजलेले किंवा पांढऱ्या डागांचे रुग्ण या शिबिरात सहभागी होऊ शकणार नाहीत.

अधिक माहितीसाठी संपर्क : आदेश चंगेडिया ९०१११५५५९९, प्रशांत गांधी ८००७०७४०००, शशिकांत मुनोत ९४२०४७७०५२, अरुण दुगड ९८२२०२७३७३

५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करा

शिक्षक भारतीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नगर – राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. अशी माहिती शिक्षक भरतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.

केंद्र शासनाने १ जानेवारी २०२६ पासून केंद्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा निर्णय घेतल्याचा संदर्भ निवेदनात देण्यात आला आहे. केंद्र व राज्य कर्मचाऱ्यांच्या वेतनमानात समानता राखण्याच्या धोरणानुसार महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांनाही सध्या मिळणाऱ्या ६० टक्के महागाई भत्त्यापैकी ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निर्णयाचा लाभ कार्यरत कर्मचाऱ्यांसह सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही मिळावा आणि त्याबाबत शासन आदेशात स्पष्ट तरतूद करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा असल्याने शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मागणीसाठी शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, विजय लंके, आनंद झरेकर, आशा लंके, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, कैलास जाधव, कार्यवाह संजय भुसारी, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, महिला जिल्हाध्यक्ष अशा मगर, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर यांनी पाठिंबा दिला आहे.

रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनीच्यावतीने नवजात अर्भकांसाठी बेबी किट वाटप

गरजू कुटुंबातील मातांना बाळाच्या संगोपनात हातभार लागावा : कुंदा हळबे यांचे प्रतिपादन


समाजातील गरजू घटकांच्या आरोग्याची आणि सुदृढ भविष्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या वतीने नवजात अर्भकांसाठी बेबी किट वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

नगर – समाजातील गरजू घटकांच्या आरोग्याची आणि सुदृढ भविष्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या वतीने नवजात अर्भकांसाठी बेबी किट वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. रोटरीच्या माता व बाल आरोग्य या विशेष मोहिमेअंतर्गत तसेच स्त्री जन्माचे स्वागत या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे डॉक्टर विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्या स्त्री रोग विभागातील नवजात बालकांना बेबी किटचे वाटप करण्यात आले.

नवजात शिशूंचे थंडी आणि संसर्गापासून संरक्षण व्हावे तसेच बाळाच्या जन्मानंतर लगेच लागणाऱ्या मूलभूत वस्तूंची गरज पूर्ण व्हावी या हेतूने या बेबी किटची रचना करण्यात आली आहे. या बेबीकेटमध्ये बाळासाठी आवश्यक ते मऊ सुती कपडे देण्यात आले आहेत. बाल दिनाच्या पार्श्वभूमीवर व आयर्न लेडी इंदिरा गांधी व राणी लक्ष्मीबाई यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम राबवण्यात आला. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या चार्टर प्रेसिडेंट रोटेरियन कुंदा हळबे आणि रोटेरियन विभा तांबडे यांच्या हस्ते हे वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना कुंदा हळबे म्हणाल्या, नवजात बालकांचे आरोग्य ही आपल्या समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. गरजू कुटुंबातील मातांना बाळाच्या संगोपनात थोडाफार हातभार लागावा या भावनेतून हा उपक्रम आम्ही हाती घेतला आहे. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून रोटरी कडून हा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या प्रशासनाने आणि लाभार्थी मातांनी रोटरी क्लबच्या संवेदनशील उपक्रमाचे कौतुक करून आभार मानले. ग्रामीण भागात स्त्रिया व मुलींसाठी रोटरी क्लब बरोबर काम करण्याचा प्रस्ताव विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्यावतीने यावेळी बोलून दाखवला.

यावेळी विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलचे डायरेक्टर क्लिनिकल डॉ. अरुण त्यागी, डीन डॉक्टर विजय पाटील, मेडिसिन विभागाच्या प्रोफेसर डॉ. मर्सिया वारन, स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. गौतम आहेर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रसाद काजळे, सोशल वर्कर स्त्री रोग विभाग उज्वला थोरात उपस्थित होते.

कचरा संकलनासाठी मनपाच्या ताफ्यात आणखी दहा घंटागाड्या दाखल

मोठ्या घंटागाड्यांमुळे कचरा संकलनाला गती; आ. संग्राम जगताप यांच्याकडून पाहणी


अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत शहरातील कचरा संकलनासाठी नव्याने दाखल झालेल्या दहा घंटागाड्यांची आ. संग्राम जगताप यांनी पाहणी केली. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत शहरातील कचरा संकलनाचे काम एजन्सीमार्फत घंटागाड्यांच्या सहाय्याने केले जाते. या व्यवस्थेला अधिक गती मिळावी आणि कचरा संकलनाच्या कामात सुसूत्रता यावी, यासाठी एजन्सीच्या माध्यमातून आणखी दहा मोठ्या घंटागाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या घंटागाड्यांमुळे एकाच वेळी अधिक प्रमाणात कचरा संकलित करणे शक्य होणार असून, शहरातील कचरा लवकर उचलण्यास मदत होईल, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

नव्याने दाखल झालेल्या दहा घंटागाड्यांची आ. जगताप यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी कचरा संकलन व्यवस्थेची माहिती घेतली. या घंटागाड्यांमध्ये ओला आणि सुका कचरा स्वतंत्रपणे टाकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आ. जगताप म्हणाले की, शहरातील स्वच्छता टिकवून ठेवण्यासाठी कचरा संकलन व्यवस्था प्रभावी असणे आवश्यक आहे. मोठ्या क्षमतेच्या घंटागाड्या उपलब्ध झाल्यामुळे एकाच वेळी जास्त कचरा उचलता येईल. परिणामी कचरा संकलनाचे काम अधिक जलद गतीने होऊन संपूर्ण व्यवस्थेत सुसूत्रता निर्माण होईल. नागरिकांना नियमित आणि प्रभावी सेवा देण्यासही यामुळे मदत होणार आहे.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी प्रशासनासोबतच नागरिकांचीही आहे. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरातील ओला आणि सुका कचरा वेगवेगळा ठेवून तो घंटागाडीत उपलब्ध असलेल्या स्वतंत्र कप्प्यांमध्येच टाकावा. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण केल्यास त्याचे व्यवस्थापन करणे सोपे होईल. शहराच्या स्वच्छतेसाठी नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन आ. जगताप यांनी केले. यावेळी नवीन घंटागाड्यांची पाहणी करताना आ. जगताप यांच्या समवेत स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक विपुल शेटीया, गोरख पडोळे, वृषभ भंडारी आदी उपस्थित होते.

केडगावमध्ये २६ नोव्हेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल स्ट व आनंदऋषीजी नेत्रालयाचा पुढाकार; शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन

नगर – श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्ट व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरुम येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दृष्टीदोष असलेल्या गरजूंसाठी मागील १९ वर्षांपासून वासन उद्योग समूहाचे चेअरमन विजय वासन यांच्या मार्गदर्शनाखाली गरजूंसाठी या शिबिराचे आयोजन केले जात आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन विजय वासन, तरुण वासन व जनक आहुजा यांनी केले आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी आनंदऋषीजी नेत्रालय हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर मंडळी करणार आहेत. तर मोतीबिंदू असलेल्या रुग्णांना तपासणीनंतर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. टाक्याचे ऑपरेशन व बिन टाक्याचे (फेको लेसर) ऑपरेशन अल्पदरात केले जाणार आहे. तर शिबीरार्थींना नंबरचे चष्मे कार्यक्रम स्थळी मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती अनिश आहुजा व जालिंदर बोरुडे यांनी दिली.

शिबिरार्थींना येताना रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र व आधारकार्डची झेरॉक्स आणने आवश्यक आहे. नाव नोंदणीसाठी जालिंदर बोरुडे ९८८१८१०३३३ व वासन टोयोटा ९६०४०३८२३४ यांच्या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

बालदिनाचे औचित्य साधून सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक व आनंददायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

बालदिनाचे औचित्य साधत 'शिक्षक बनली मुले'

नगर – बालदिनाचे औचित्य साधून सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक व आनंददायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात संगीत शिक्षक बाळासाहेब पठारे यांनी सादर केलेल्या बालगीताने झाली.

शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी लकडी की काठी हे लोकप्रिय बालगीत सादर करून विद्यार्थ्यांच्या आनंदात भर घातली. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे शिक्षकांनी मुलांच्या वेशभूषेत केलेले बहारदार सादरीकरण! शिक्षकांनी विविध बालगीतांवर नृत्य, अभिनय आणि मनोरंजक सादरीकरण करून विद्यार्थ्यांचे भरभरून मनोरंजन केले. आपल्या शिक्षकांचे हे अनोखे रूप पाहून विद्यार्थीही आनंदाने भारावून गेले. या आनंदोत्सवाला माध्यमिकच्या प्राचार्य गीता तांबे आणि माध्यमिक विभागातील सर्व शिक्षकांची उपस्थिती लाभली.

बालदिनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी खास खाद्यपदार्थांची मेजवानी आयोजित करण्यात आली होती. शाळेच्या परिसरात विविध खाद्यपदार्थांचे आकर्षक स्टॉल्स उभारण्यात आले होते. बर्गर, भेळ, पेस्ट्री, नूडल्स अशा विविध चविष्ट पदार्थांचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी आणि हरेष मध्यान यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

सरस्वती विद्यालयात 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियानाचा १४ वा आठवडा उत्साहात साजरा


महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमाच्या १४ व्या आठवड्याचा कार्यक्रम केडगाव येथील सरस्वती विद्या मंदिर येथे आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत पार पडला.

नगर – अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमाच्या १४ व्या आठवड्याचा कार्यक्रम केडगाव येथील सरस्वती प्राथमिक व माध्यमिक विद्या मंदिर, देवी रोड, प्रभाग क्रमांक १७ येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमाला अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी नाटिकेतून दिला डेंग्यू प्रतिबंधाचा संदेश

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. त्यांनी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्व सांगितले. डेंग्यूमुक्त शहरासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून स्वच्छतेची सुरुवात करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यू प्रतिबंध या विषयावर आकर्षक जनजागृतीपर नाटिका सादर केली. या नाटिकेतून डासांची उत्पत्ती कशी होते, डेंग्यूचा प्रसार कसा रोखता येतो आणि नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, याचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून उपस्थितांना स्वच्छता आणि आरोग्याचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला.

महापालिकेचे उपायुक्त हरिकल्याण येलगट्टे यांनी भाषणात डेंग्यू आजाराची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली. घराच्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी व टाक्या नियमित स्वच्छ ठेवणे, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे या गोष्टी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःपुरती काळजी न घेता आपल्या कुटुंबात आणि परिसरातही डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

नगरसेवक मनोज कोतकर यांनी भाषणात प्रभाग क्रमांक १७ मध्ये स्वच्छता आणि आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. डेंग्यूमुक्त अहिल्यानगर हे स्वप्न साकार करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनासोबतच लोकप्रतिनिधी, शाळा आणि नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहोचवून समाजामध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करावी. स्वच्छ परिसर हीच निरोगी जीवनाची पहिली पायरी आहे, असे त्यांनी नमूद केले.

नगरसेविका अश्विनीताई सुमित लोंढे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, केडगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश दळवी, विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर, डॉ. परमेश्वर काळे, प्रभाग अधिकारी सुखदेव गुंड, स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल, भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे, वैभव कदम पाटील आदी उपस्थित होते.

अहिल्यानगर महापालिका आयोजित सार्वजनिक श्री गणेशोत्सव देखावा स्पर्धेत 'लोकमान्य टिळक, बालाजी युवक, शिवव्रत प्रतिष्ठान, जय हिंद तरुण, ग्रामदैवत श्री विशाल गणपती' विविध विभागात प्रथम

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने आयोजित सार्वजनिक श्री गणेशोत्सव देखावा स्पर्धेत टिळक रोड येथील लोकमान्य टिळक मित्र मंडळाने सादर केलेल्या खंडोबा-बानू विवाह सोहळ्याच्या देखाव्याला धार्मिक व आध्यात्मिक देखावे विभागात प्रथम क्रमांक मिळाला. मंडळाच्या सदस्यांनी वाजतगाजत आणि सनईच्या सुरेल निनादात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारले. महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते विजेत्या गणेश मंडळांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.





(छायाचित्र : लहू दळवी)

स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना २५ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना १५ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना १० हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी ब्रिगेडियर राजीव चावला यांचा सीक्यूएव्ही परिसरात साडेतीन लाख देशी वृक्षांची लागवड केल्याबद्दल, तसेच राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल दिया जासूद हिचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास ब्रिगेडियर राजीव चावला, सभापती दीपाली बारस्कर, अमोल गाडे, नगरसेवक विकी जगताप, प्रकाश भागानगरे, मोहित पंजाबी, नगरसेविका आशा डागवले, उपायुक्त मेहर लहारे, उपायुक्त निखिल फराटे, सहाय्यक आयुक्त हरीकल्याण येलगट्टे, परीक्षक श्रेणिक शिंगवी, शशिकांत नजन, अभिजित दरेकर, आर्किटेक्ट अजय अपूर्वा, क्रीडा अधिकारी फिलिप्स आदींसह शहरातील विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभासद आणि गणेशभक्त उपस्थित होते. सूत्रसंचालन रुपेश पसपुल यांनी केले, तर उपायुक्त मेहर लहारे यांनी आभार मानले.

गणेश मंडळांनी पाणी बचतबाबत जागृती करावी : महापौर

महापौर गाडे म्हणाल्या की, लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सव सुरू करून समाजप्रबोधनाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण केले. गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरेचा वारसा जपण्याचे काम होत आहे. या देखाव्यांतून समाजाला सुंदर विचार देण्याचे काम केले जाते. व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, समाजात घडणाऱ्या सत्य घटना, छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास तसेच संत-महंतांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी गणेशोत्सवातील देखावे महत्त्वाची भूमिका बजावतात. आता गणेश मंडळांनी पुढाकार घेऊन समाजात पाणी बचतीबाबत जनजागृती करावी. आपल्यासमोर पाण्याचे मोठे संकट उभे आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून पाण्याची बचत करणे आवश्यक आहे.

शहरातील स्वच्छतेवर दहा कोटी रुपये खर्च : आयुक्त

आयुक्त डांगे म्हणाले की, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणी बचतीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. शहरातील स्वच्छतेवर महानगरपालिकेच्या माध्यमातून सुमारे दहा कोटी रुपये खर्च केले जातात. नागरिकांनीही आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्वीकारावी आणि घरातील कचरा घंटागाडीतच टाकावा. त्यामुळे आपले शहर स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत होईल. डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. त्यामुळे डेंग्यू आजारावर नियंत्रण मिळविण्यात यश आले असल्याचे आयुक्त डांगे यांनी सांगितले.

यंदा जिवंत देखाव्यांचे प्रमाण वाढले : परीक्षक शिंगवी

परीक्षक श्रेणिक शिंगवी म्हणाले की, यावर्षीचा गणेशोत्सव काहीसा वेगळा होता. यंदा जिवंत देखाव्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले, तर मूर्ती देखाव्यांचे प्रमाण तुलनेने कमी होते. शहरातील मित्र मंडळांनी डोळ्यांचे पारणे फेडणारे देखावे तयार केले होते. या देखाव्यांच्या माध्यमातून ३०० पेक्षा जास्त मुलांना रोजगार मिळाला आहे. यंदाचा गणेशोत्सव देखणा झाला असून प्रत्येक मित्र मंडळाने सामाजिक भान जपत समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य पार पाडले, असे त्यांनी सांगितले.

धार्मिक व आध्यात्मिक देखावे विभागातील विजेत

धार्मिक व आध्यात्मिक देखावे विभागात प्रथम क्रमांक टिळक रोड येथील लोकमान्य टिळक मित्र मंडळाने सादर केलेल्या खंडोबा-बानू विवाह सोहळा या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक विभागून बंगाल चौकी मित्र मंडळाच्या खंडोबा-बानू विवाह सोहळा आणि नवरत्न मित्र मंडळ, माळीवाडा यांच्या सप्तशृंगीचा अवतार या देखाव्यांना मिळाला. तृतीय क्रमांक विभागून महालक्ष्मी मित्र मंडळ, माळीवाडा यांच्या महालक्ष्मीची कथा आणि राजयोग प्रतिष्ठान, स्वस्तिक चौक यांच्या खंडोबा-बानू विवाह सोहळा या देखाव्यांना मिळाला.

समाजप्रबोधनपर देखावे विभागातील विजेते

समाजप्रबोधनपर देखावे विभागात प्रथम क्रमांक बालाजी युवक मंडळ, मंगल गेट यांच्या बदलाची सुरुवात आपल्यापासून या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक विभागून वीर राजे मित्र मंडळ, सुगंधी चाळ यांच्या बेटी बचाव आणि श्री कपिलेश्वर मित्र मंडळ ट्रस्ट यांच्या मिशन भेसळ मुक्त भारत या देखाव्यांना मिळाला. तृतीय क्रमांक विभागून स्वामी विवेकानंद तरुण मंडळ, स्नेहालय यांच्या उडान - रस्ता बदलायला हवा, बालविवाह थांबवा, बालपण वाचवा आणि नवग्रह प्रतिष्ठान मित्र मंडळ, नेती नाका यांच्या महाराष्ट्र निर्मितीचे तीन आधारस्तंभ या देखाव्यांना मिळाला.

ऐतिहासिक व गडकिल्ले देखावे विभागातील विजेते

ऐतिहासिक व गडकिल्ले देखावे विभागात प्रथम क्रमांक शिवव्रत प्रतिष्ठान, पटवर्धन चौक यांच्या शिवराज्याभिषेक या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक सिद्धेश्वर मित्र मंडळ, जम्बुभाई तालीम यांच्या बाजीप्रभू देशपांडे, वीर शिवा काशीद या देखाव्याला, तर तृतीय क्रमांक नंदनवन मित्र मंडळ यांच्या युगत मांडली या देखाव्याला मिळाला.

सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञान देखावे विभागातील विजेते

सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञान देखावे स्पर्धेत प्रथम क्रमांक जय हिंद तरुण मंडळ, दवा बाजार, नांगरे गल्ली यांच्या दशावतार या देखाव्याला मिळाला. द्वितीय क्रमांक बागडपट्टीचा राजा मित्र मंडळ यांच्या सृष्टीची उत्पत्ती आणि विनाश या देखाव्याला, तर तृतीय क्रमांक शिवगर्जना प्रतिष्ठान यांच्या गुप्तहेरगिरी ही स्वराज्याची ढाल या देखाव्याला मिळाला.

प्रबोधनपर, शिस्तबद्ध व पारंपरिक पद्धतीने मिरवणूक विभागातील विजेते

प्रबोधनपर, शिस्तबद्ध व पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढणाऱ्या मंडळांच्या विभागात प्रथम क्रमांक ग्रामदैवत श्री विशाल गणपती, माळीवाडा यांना मिळाला. द्वितीय क्रमांक विभागून तालयोगी, सावेडी आणि मोरया युवा प्रतिष्ठान, गुलमोहर रोड यांना मिळाला. तृतीय क्रमांक विभागून गोरक्षनाथ युवा प्रतिष्ठान, वैदुवाडी, सावेडी आणि लोकमान्य नगर मित्र मंडळ, विस्तवाक चौक यांना मिळाला.

रांगोळी स्पर्धा व विशेष उत्तेजनार्थ पारितोषिके

तसेच उत्कृष्ट रांगोळी स्पर्धेत रंग संस्कृती ग्रुप, अहिल्यानगर आणि सम्राट तरुण मंडळ, चितळे रोड यांचा गौरव करण्यात आला. धार्मिक व आध्यात्मिक देखावे स्पर्धेत विशेष उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी शेरकर गल्ली मित्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आलेले बारा ज्योतिर्लिंग दर्शन आणि सिद्धिविनायक मित्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आलेला तिरंगा चौक, मनसे मळा, सावेडी - कर्दळीवन या देखाव्यांची निवड करण्यात आली.

जागृती बागल हिची रोल बॉल वर्ल्डकपसाठी भारतीय संघात निवड



नगर – रोल बॉल या खेळाच्या भारतीय संघात नगरच्या जागृती बागल हिची निवड झाली आहे. पुढील महिन्यात इंदोर येथे होणाऱ्या दुसऱ्या कुमार रोल बॉल वर्ल्डकप सामन्यांमध्ये ती भारताकडून खेळणार आहे. रोल बॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने जागृती बागलची वर्ल्डकप साठी भारतीय संघात निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. जागृती ही उद्योजक महेश बागल यांची कन्या आहे.

जागृती बागल हीने वयाच्या सहाव्या वर्षांपासून स्केटिंग, रोल बॉल या खेळत विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळवले आहे. या खेळासाठी पुण्याचे राजू दाभाडे, अहिल्यानगर रोल बॉल जिल्हा असोसिएशनचे सचिव सोमनाथ घुगे, प्रशिक्षक आनंद पटेकर, ॲड. अरुण जंजिरे व चंद्रकांत निकम आदींचे मार्गदर्शन लाभले आहे. सध्या ती अहिल्यानगरच्या तक्षशिला स्कूलमध्ये इयत्ता ९ वीत शिकत आहे. इंदोर येथे ६ ते ९ डिसेंबर या कालावधीत रोल बॉल वर्ल्डकपचे सामने होणार आहेत. यासाठी जागृती पुण्यात होणाऱ्या प्रशिक्षण व सराव शिबिरास रवाना होणार आहे.

'सन इंडिया फिल्म'च्या नव्या चित्रपटासाठी एआय व्हिडीओ एडीटरांनी अर्ज करावेत

नगर – येथील सन इंडिया फिल्म या चित्रपट बनविणाऱ्या कंपनीसाठी एआय व्हिडीओ एडीटरसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. आगामी मराठी फिल्म प्रोजेक्टसाठी एआय एडिटिंगची संपूर्ण माहिती असलेले अनुभवी व क्रिएटिव्ह मुले किंवा मुलींसाठी ही एक संधी उपलब्ध होत आहे. एआयच्या माध्यमातून व्हिडिओ एडिटिंग करणे, प्रत्येक सीनला योग्य पार्श्वभूमीचे संगीत देणे, कॉमेडी, सस्पेन्स आणि लव्ह सीनचे एडिटिंग करणे, सिनेमॅटिक इफेक्टस् आणि ट्रान्झिशन्स देणे तसेच एआयच्या माध्यमातून आवाज आणि कलर ग्रेडिंग करणे आदि कामे या निवड झालेल्या उमेदवारांना करता येतील.

यासाठी उमेदवारास एआय एडीटींगचे संपूर्ण ज्ञान असावे आणि सध्या प्रचंड बोलबाला असलेल्या चॅटजीपीटीचेही संपूर्ण ज्ञान असावे. वेळोवेळी नवीन येत असलेल्या एआय टूल्स वापरण्याचा अनुभव त्यास असावा. तो मेहनती, प्रामाणिक आणि क्रिएटिव्ह असावा, असे सांगण्यात आले. या जागांसाठी काम करण्याची तयारी असल्यास उमेदवारांनी ८०८०४६१११० या मोबाईल क्रमांकावर सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन संचालकांतर्फे करण्यात आले आहे.

'श्री रेणुका ट्रॅव्हल्स कंपनी' तर्फे ११ मारुती दर्शन, राजस्थान आणि नर्मदा परिक्रमा यात्रेचे आयोजन

३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी आवश्यक; सहलकाळात घरगुती जेवणामुळे पर्यटकांची पसंती

नगर – श्रीरेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस यात्रा कंपनीने खास लोकाग्रहास्तव ११ मारुती दर्शन, राजस्थान आणि नर्मदा परिक्रमा यात्रांचे आयोजन केले आहे. यामध्ये सहल काळात कितीही दिवस बाहेरगावी राहण्याची वेळ आली तरी या ट्रॅव्हल्स कंपनीमार्फत घरगुती पद्धतीने विविध चवदार पदार्थांचे जेवण दिले जाते. त्यामुळे पर्यटकांना या ट्रॅव्हल्स कंपनीविषयी विशेष प्रेम वाटते, अशी माहिती संचालिका सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी दिली.

११ मारुती दर्शन यात्रा २५ ते २७ डिसेंबर अशी तीन दिवसांची होणार आहे. या यात्रेत श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबाची वाडी, मोरगाव आदि ठिकाणे सहभागितांना पाहता येतील.

३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ दरम्यान १४ दिवस होत असलेल्या मेवाड व मारवाडसह राजस्थान स्पेशल यात्रेत जोधपूर, जैसलमेर, जयपूर, बिकानेर, पुष्करतीर्थ, चितोडगड, उदयपूर, माऊंटआबू, खाटुश्याम, सालासार बालाजी आदि ठिकाणांना भेटी देण्यात येणार आहेत, अशी माहिती देण्यात आली. एक आठवड्यापेक्षा जास्त कालावधीसाठी होणार्या मेवाड व मारवाडसह राजस्थान ही यात्रा रेल्वेने होणार असल्याने या यात्रेसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत बुकींग करणे आवश्यक आहे.

१८ मार्च ते ३ एप्रिल २०२७ दरम्यान १७ दिवस होणार्या नर्मदा परिक्रमा या स्पेशल यात्रेत शेगांव, ओंकारेश्वर, प्रकाशा, बडवानी, बिमलेश्वर, निलकंठेश्वर, नारेश्वर, गरुडेश्वर, महेश्वर, उज्जैन, नेमावर, जबलपूर, अमरकंटक, महाराजपूर, होशंगाबाद आदि ठिकाणांना भेटी देण्यात येणार आहेत, अशी माहिती देण्यात आली. नर्मदा परिक्रमा ही रेणुका ट्रॅव्हल्सतर्फे होत असलेली यात्रा अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने केली जात असल्याने ग्राहक या यात्रेसाठी खास रेणुका ट्रॅव्हल्सच्या सहल कार्यक्रमाची वाट पाहत असतात, असे सौ. दीपाली जोशी यांनी सांगितले. यावर्षी उन्हाळ्यामुळे ही यात्रा २ बाय २ पुशबॅक सीट, एसी, एअर सस्पेन्शन्स ४९ सिटर लक्झरी बसने होणार आहे.

रेणुका ट्रॅव्हल्समार्फत आयोजित करण्यात येणार्या सर्वच सहलींसाठी मर्यादित जागा असल्याने व्यवस्थित सोय होते. सहलीमध्ये आयोजक पती-पत्नी स्वतः तसेच त्यांचा कर्मचारीवर्ग सहभागी होत असल्याने घरगुती पद्धतीचे जेवण देण्यात येते. घरगुती पदार्थांमध्ये सकाळच्या नाश्त्यापासून दुपारी व सायंकाळचे दोनवेळचे जेवण घरगुती पद्धतीनेच देण्यात येते. घरी बनवले जाते त्याप्रमाणेच वेगवेगळ्या चवीचे व प्रकारचे पदार्थ सहभागितांना देण्यात येतात. वेगवेगळ्या वयोगटातील पर्यटकांचा विचार करून त्याप्रमाणे पदार्थ बनविण्यात येतात. वृद्धांसाठी केअरटेकरची सुविधा आहे. सर्व शासकीय नियमांचे पालन करून पर्यटकांच्या संपूर्ण सुरक्षेची काळजी घेण्यात येते. राहण्याचीही उत्तम व्यवस्था असते.

वाजवी व रास्त दर असल्याने ही कंपनी अल्पकाळात लोकप्रिय ठरली असून पर्यटकांची खूप आधीच वेगवेगळ्या सहलींसाठी विचारणा होते. ही आपल्यावरील विश्वासाची पावती असल्याचे आम्हाला वाटते, असे संचालक श्यामकांत क्षीरसागर यांनी सांगितले. सहलींमध्ये सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी रेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस (डॉ. पानसंबळ हॉस्पिटलमागे, कुष्ठधाम रस्ता, निलम स्टोअर्सजवळ, पोलिस कॉलनी, सावेडी, नगर, मोबाईल क्रमांक ९९२२२४०५१५ व ९४०५०३२६९८) आणि सौ. दिपा जोशी (मो. ८३७९८४१२६१, ९४०४४०१६९९) येथे नाव नोंदवावे, असे सांगण्यात आले आहे.



मलेशिया येथील आशिया ओशियाना कॉर्फबॉल क्रीडा स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वी दिशान किशोर गांधी याचा हिंद सेवा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

दिशान गांधी हा हिंद सेवा मंडळाची शान

मानद सचिव सुमतीलाल कोठारी यांचे गौरवोद्गार

नगर – हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा कॉलेजकडून विद्यापीठ स्तरावर आणि पुढे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर दिशान गांधी याने कॉर्फबॉल क्रीडा प्रकारात देदीप्यमान यश मिळवले आहे. तो कॉलेजसह हिंद सेवा मंडळाची शान आहे. त्याची क्रीडा क्षेत्रातील भरारी व कर्तृत्व अभिमानास्पद आहे, असे कौतुकोद्गार मंडळाचे मानद सचिव सुमतीलाल कोठारी यांनी काढले.

मलेशिया येथील आशिया ओशियाना कॉर्फबॉल क्रीडा स्पर्धेसाठी रवाना होण्यापूर्वी दिशान गांधी याचा हिंद सेवा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कोठारी बोलत होते. याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष व श्रीरामपूरचे माजी उपनगराध्यक्ष रवींद्र गुलाटी म्हणाले की, दिशानच्या सत्कारास उपस्थित राहताना मला खूप आनंद होत आहे. त्याच्या कामगिरीची माहिती संस्थेच्या सर्व शाळा, महाविद्यालयात दिली जावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना खूप मोठे प्रोत्साहन मिळेल.

संचालक अजित बोरा यांनी सांगितले की, दिशान व कॉर्फबॉल खेळाच्या प्रेरणेसाठी मंडळाने मैदान व आवश्यक क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिले आहे. कॉर्फबॉल असोसिएशनच्या माध्यमातून मंडळाचे सदस्य किशोर गांधी हे खेळाच्या प्रसारासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

अध्यक्ष अनंत फडणीस व संचालक संजय जोशी यांनी फोनवरून दिशानला शुभेच्छा दिल्या.

सारडा कॉलेजच्या प्राचार्या माहेश्वरी गावित व लंडन स्थित यश गुलाटी यांनीही दिशानचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

दिशानने मंडळासह विविध संस्था, स्नेहीजनांचे प्रेम, आशीर्वाद व पाठबळासाठी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी मंडळाचे सभासद किशोर गांधी, शुभम भंडारी आदी उपस्थित होते.

'न्याय रक्षा परिषदेच्या राज्य' अध्यक्षपदी नंदकिशोर भालारे



नगर – न्याय रक्षा परिषद या सामाजिक व जनहिताभिमुख संघटनेच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी नंदकिशोर उद्धवराव भालारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संस्थापक प्रमुख ॲड. अंकित राज यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.

न्याय रक्षा परिषदेच्या माध्यमातून अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देणे, सर्वसामान्यांच्या समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविणे, तसेच शैक्षणिक, सामाजिक व जनहिताचे विविध उपक्रम राबविणे हे उद्दिष्ट आहे. भालारे हे सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून वंचित, अन्यायग्रस्त आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन तसेच संघटनेची ध्येयधोरणे राज्यभर प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या नियुक्तीप्रसंगी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष योगेश कालूराम बाराथे, उपाध्यक्ष मच्छिंद्र निवृत्ती ढगे, महिला अध्यक्षा कमलताई मुसळे, महिला उपाध्यक्षा गौरी क्षीरसागर, महासचिव आशीर्वाद लोखंडे, ज्येष्ठ सल्लागार वसंत नाना आरोटे, प्रवक्ते अजय पवार, सचिव श्याम बबन पवार आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अंकित राज यांनी भालारे यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नियुक्तीमुळे महाराष्ट्रात परिषदेचे संघटन अधिक मजबूत होऊन अन्यायग्रस्त व वंचित नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रभावीपणे कार्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी टोल फ्री क्रमांक देणार

नगरसेवक डॉ. सागर बोरुडे



महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू दाखले विभागाची आरोग्य समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे आणि उपाध्यक्ष दत्ता गाडळकर यांनी पाहणी केली. (छायाचित्र : लहू दळवी)

जन्म, मृत्यू व नावात बदलासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी दर्शनी भागात लावण्याच्या सूचना

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेचा जन्म-मृत्यू दाखले विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. नागरिकांना जन्म, मृत्यू तसेच नावात बदल करून घेण्यासाठी आवश्यक दाखले वेळेत उपलब्ध व्हावेत, यासाठी विभागातील काम काजात सुसूत्रता आणणे गरजेचे आहे. नागरिकांना दाखल्यांसाठी वारंवार कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी विभागाला टोल फ्री दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच जन्म, मृत्यू आणि नावात बदल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी दर्शनी भागात फलकावर लावण्यात यावी, अशा सूचना मनपा आरोग्य समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी दिल्या.

महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू दाखले विभागाची आरोग्य समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. बोरुडे आणि उपाध्यक्ष नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी विभागातील कर्मचाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी आणि कामकाजातील समस्या जाणून घेतल्या.

यावेळी डॉ. बोरुडे म्हणाले की, जन्म-मृत्यू विभागात नागरिक जन्माचे दाखले, मृत्यूचे दाखले तसेच नावात बदल करून घेण्यासाठी येत असतात. मात्र, काही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणींमुळे दाखले मिळण्यास विलंब झाल्यास नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जाते. त्यामुळे नागरिकांच्या समस्या समजून घेण्याबरोबरच विभागातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेणेही आवश्यक आहे. पाहणीदरम्यान कर्मचाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले असून, त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

विभागाला टोल फ्री दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून दिल्यानंतर नागरिकांनी दाखल्यांच्या प्रक्रियेबाबत या क्रमांकावर संपर्क साधून माहिती घ्यावी. त्यामुळे नागरिकांना वारंवार कार्यालयात येण्याची गरज भासणार नाही. तसेच जन्म, मृत्यू आणि नावात बदल करण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची संपूर्ण यादी दर्शनी भागात फलकावर लावण्यात यावी. नागरिकांना ही माहिती सहज वाचता येईल आणि त्यानुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरता येईल. परिणामी अर्जातील त्रुटी कमी होऊन कार्यालयातील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

अर्थजगत



एसआयपीचा ओघ का घटला?

दे शांतर्गत म्युच्युअल फंड उद्योगात ऑक्टोबर महिन्यात एक महत्त्वाचा बदल पाहायला मिळाला असून, नवीन एसआयपी नोंदणीमध्ये २० टक्क्यांची घट झाली आहे, तर एसआयपी बंद करण्याचे प्रमाण ११६ टक्क्यांवर पोहोचले आहे. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडियाच्या (ॲम्फी) आकडेवारीनुसार, सलग ५ महिन्यांच्या घसरणीनंतर बंद होणाऱ्या एसआयपींची संख्या नवीन सुरू होणाऱ्या एसआयपींपेक्षा जास्त झाली आहे. भांडवली बाजारातील चढ-उतार, परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांची विक्री आणि महागाईच्या चिंतेमुळे अनेक किरकोळ गुंतवणूकदारांनी तात्पुरती सावध भूमिका घेतल्याचे यातून दिसून येते.

असे असले तरी एकूण मासिक एसआयपी गुंतवणुकीचा आकडा ३२,१६० कोटी रुपयांवर भक्कमपणे स्थिर राहिला असून, देशांतर्गत गुंतवणूकदारांचा दीर्घकालीन विश्वास अद्यापही कायम आहे.

याच काळात काही म्युच्युअल फंड हाऊसेसनी आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीचे नवे दरवाजे उघडले असून, परदेशी समभागांमध्ये गुंतवणूक करणारे नवे फंड सादर केले आहेत. मात्र, बाजार विश्लेषकांच्या मते, बाजारात ८ ते १० टक्क्यांची घसरण सुरू असताना एसआयपी बंद करणे किंवा हप्ते थांबवणे ही गुंतवणूकदारांची सर्वात मोठी चूक ठरू शकते.

जेव्हा बाजार खाली येतो, तेव्हा एसआयपीच्या माध्यमातून त्याच मासिक रकमेत फंडाचे अधिक युनिट्स खरेदी केले जातात. या प्रक्रियेमुळे सरासरी खरेदी किंमत कमी होते आणि जेव्हा बाजार पुन्हा तेजीत येतो, तेव्हा गुंतवणूकदाराला चक्रवाढ परताव्याचा मोठा लाभ मिळतो. भूतकाळातील आकडेवारीनुसार ज्या गुंतवणूकदारांनी २००८ आणि २०२० च्या मोठ्या मंदीत आपली गुंतवणूक सुरू ठेवली, त्यांना पुढील ३ ते ५ वर्षांत सरासरी १५ ते १८ टक्क्यांपर्यंत वार्षिक परतावा मिळाला आहे. नवीन गुंतवणूकदारांनी अल्पकालीन घसरणीला न घाबरता लार्ज कॅप किंवा फ्लेक्सी कॅप फंडांमध्ये किमान ७ ते १० वर्षांसाठी आपली गुंतवणूक सुरू ठेवावी.

वाढत्या महागाईच्या काळात निश्चित उत्पन्नाचे नियोजन

कि रकोळ महागाईने रिझर्व्ह बँकेची ६ टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडल्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबे आणि निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसमोर आपल्या बचतीचे मूल्य टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान



उभे राहिले आहे. भाजीपाला, अन्नधान्य, औषधे आणि दैनंदिन गरजांच्या किमती वाढल्याने केवळ ३ ते ३.५ टक्के व्याज देणाऱ्या बचत खात्यात पैसे पडून ठेवणे आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक ठरत आहे. अशा वेळी सरकारद्वारे संचलित अल्पबचत योजना आणि बँकांच्या विशेष मुदत ठेवी हे सुरक्षित आणि निश्चित उत्पन्न देणारे महत्त्वाचे पर्याय ठरत आहेत.

अर्थतज्ज्ञांच्या विश्लेषणात १५,००,००० रुपयांच्या एकरकमी गुंतवणुकीसाठी ज्येष्ठ नागरिक बचत योजना (एससीएसएस) आणि टपाल कार्यालयाची मासिक उत्पन्न योजना (एमआयएस) यांची तुलना केली असता, ज्येष्ठ नागरिक बचत योजना अधिक फायदेशीर ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या योजनेत ८.२ टक्के वार्षिक व्याजदर मिळत असल्याने तिमाही आधारावर नियमित आणि भक्कम उत्पन्न मिळते, तसेच प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८० सी अंतर्गत १,५०,००० रुपयांपर्यंत कर सवलतीचा लाभही मिळतो. याउलट, मासिक उत्पन्न योजनेत ७.४ टक्के व्याजदर असला, तरी सर्व वयोगटातील नागरिकांना दरमहा निश्चित रक्कम मिळण्याची सोय उपलब्ध असते. प्रत्येक कुटुंबाने आपल्या नियमित बचतीसोबतच किमान ६ महिन्यांच्या अनिवार्य खर्चाएवढा आणीबाणी निधी स्वतंत्रपणे तयार ठेवला पाहिजे. हा निधी सहज काढता येईल अशा लिक्विड फंडात किंवा स्वीप-इन सुविधेच्या बचत खात्यात असावा, जेणेकरून वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी दीर्घकालीन बचत मोडण्याची वेळ येत नाही. लहान मुलींच्या भविष्यासाठी ८.२ टक्के व्याज देणारी सुकन्या समृद्धी योजना आणि दीर्घकालीन करमुक्त निधीसाठी ७.१ टक्के व्याज देणारी सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (पीपीएफ) या योजनांमध्ये नियमित गुंतवणूक सुरू ठेवणे महागाईवर मात करण्यासाठी आवश्यक आहे.



निवृत्तीनंतर तीस वर्षे पगाराशिवाय कसे जगावे?

वा ढत्या आयुर्मानामुळे निवृत्तीनंतरचे २५ ते ३० वर्षे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी राहणे हे आजच्या पिढीसमोरील सर्वात मोठे नियोजन बनले आहे. आर्थिक तज्ज्ञांच्या ताज्या विश्लेषणानुसार, जर एखाद्या व्यक्तीकडे निवृत्तीच्या वेळी २,००,००,००० रुपयांचा निधी जमा असेल आणि तिला वार्षिक ८,००,००० रुपयांची गरज असेल, तर पैसे काढण्याचा दर अत्यंत काळजीपूर्वक ठरवावा लागतो. महागाईचा दर दरवर्षी ६ टक्क्यांनी वाढत राहिल्यास, सुरुवातीला पुरेशी वाटणारी मासिक ६५,००० रुपयांची रक्कम पुढील १२ वर्षांत दुप्पट म्हणजेच १,३०,००० रुपयांपर्यंत पोहोचते आणि सामान्य खर्च भागवणे कठीण होऊन बसते.

यावर उपाय म्हणून जागतिक स्तरावर ४ टक्के पैसे काढण्याच्या नियमाचा पुरस्कार केला जातो. या सूत्रानुसार, निवृत्तीच्या पहिल्या वर्षी एकूण जमा निधीच्या केवळ ४ टक्के रक्कम वार्षिक खर्चासाठी काढावी आणि त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी महागाईच्या दरानुसार त्या रकमेत थोडी वाढ करावी. जर संपूर्ण निधी केवळ ६ ते ७ टक्के व्याज देणाऱ्या बँक ठेवींमध्ये ठेवला, तर कर आणि महागाईमुळे निधी १५ ते २० वर्षांत संपुष्टात येऊ शकतो. त्यामुळे निवृत्तीनंतरच्या निधीतील किमान ३० ते ४० टक्के हिस्सा इक्विटी म्युच्युअल फंड किंवा हायब्रीड योजनांमध्ये गुंतवलेला असणे आवश्यक आहे, जेणेकरून उरलेल्या भांडवलात वाढ होत राहील.

वैयक्तिक वित्त व्यवस्थापनात निवृत्तीच्या नियोजनाला वयाच्या ३० व्या वर्षापासूनच सुरुवात करणे हिताचे ठरते. घरखर्चासाठी ५०, जीवनशैलीसाठी ३० आणि बचतीसाठी २० टक्के या सूत्राचे पालन करून गृहकर्ज आणि इतर कर्जाचा बोजा निवृत्तीपूर्वीच पूर्णपणे संपवला पाहिजे. स्वतंत्र आरोग्य विमा कवच निवृत्तीनंतरही सुरू ठेवल्यास उपचारांचा मोठा खर्च निवृत्ती निधीला धक्का लावू शकत नाही. योग्य मालमत्ता वाटप आणि शिस्तबद्ध खर्च नियंत्रण यामुळेच निवृत्तीनंतरचा काळ सन्मानाने आणि तणावमुक्त जगता येतो.

भारतीय शेअर बाजारात विदेशी गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरू झाला असून, निर्देशांकांनी नवी उंची गाठली आहे. मात्र, बाजारातील तेजी पाहून घाईघाईने गुंतवणूक वाढवणे योग्य ठरणार नाही. किरकोळ गुंतवणूकदारांसाठी सध्याचा काळ संधींबरोबरच सावधगिरीचाही आहे.

विदेशी गुंतवणूकदार परतले; छोट्या गुंतवणूकदारांनी आता काय करावे?

दो न वर्षांहून अधिक काळ भारतीय शेअर बाजारापासून काहीसे दूर राहिलेले विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार पुन्हा सक्रिय झाले आहेत. नोव्हेंबरमध्ये आतापर्यंत त्यांनी भारतीय समभागांमध्ये निव्वळ ७३,२०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केल्याचे उपलब्ध आकड्यांतून दिसते. हा मासिक गुंतवणुकीचा नवा उच्चांक असल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वी डिसेंबर २०२३ मध्ये सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती.

विदेशी भांडवलाच्या या ओघामुळे नोव्हेंबरमध्ये सेन्सेक्स आणि निफ्टी सुमारे १३ टक्क्यांनी वधारले आहेत. सूचीबद्ध कंपन्यांच्या एकत्रित बाजारमूल्यात सुमारे ३६ लाख कोटी रुपयांची भर पडली असून, ते ५१२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे वृत्त आहे. अर्थात, बाजारमूल्यातील ही वाढ म्हणजे गुंतवणूकदारांच्या खात्यात प्रत्यक्ष तेवढी रक्कम जमा झाली, असा अर्थ होत नाही.

■ **विदेशी गुंतवणूकदार भारताकडे का वळले? :** अमेरिका आणि आशियातील काही बाजारांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांचे समभाग महाग झाले आहेत. त्यामुळे जागतिक गुंतवणूकदार आपल्या गुंतवणुकीची फेररचना करत आहेत. भारतीय बाजारात बँकिंग, उत्पादन, पायाभूत सुविधा आणि ग्राहकोपयोगी वस्तू अशा विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध आहेत. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांनंतर आखाती युद्धाचे संकट टळण्याच्या शक्यता, यामुळे कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेली मोठी घसरण भारतासाठी अनुकूल ठरली आहे. भारताची तेलासाठी आयातीवर मोठी अवलंबित्व असल्याने तेल स्वस्त झाल्यास आयातखर्च, महागाई आणि रुपयावरील दबाव कमी होण्यास मदत होते. याशिवाय, काही काळ भारतीय बाजाराची कामगिरी तुलनेने कमकुवत राहिल्याने निवडक कंपन्यांचे मूल्यांकन आकर्षक झाले आहे.



■ **तेजीमध्ये गुंतवणूक वाढवावी का?:** विदेशी गुंतवणूकदारांची खरेदी वाढली म्हणून किरकोळ गुंतवणूकदारांनी तातडीने मोठी रक्कम शेअर बाजारात गुंतवण्याची आवश्यकता नाही. विदेशी गुंतवणूक अनेकदा जागतिक व्याजदर, चलनातील चढउतार आणि इतर बाजारांतील संधींवर अवलंबून असते. त्यामुळे आज भारतीय बाजारात येणारे भांडवल परिस्थिती बदलल्यास बाहेरही जाऊ शकते. विशेषतः मध्यम आणि लहान कंपन्यांच्या समभागांबाबत सावधगिरी आवश्यक आहे. अनेक कंपन्यांचे मूल्यांकन अद्याप त्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नवाढीच्या तुलनेत महाग आहे. अशा परिस्थितीत अपेक्षेपेक्षा कमी नफा जाहीर झाला तरी समभागांच्या किमती मोठ्या प्रमाणात घसरू शकतात.

■ **एसआयपी बंद करू नका; पोर्टफोलिओ तपासा :** नियमित म्युच्युअल फंड गुंतवणूक करणाऱ्यांनी बाजारातील तेजीमुळे एसआयपी बंद करण्याचे किंवा अचानक हप्ते वाढवण्याचे टाळावे. दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांनुसार नियमित गुंतवणूक सुरू ठेवणे अधिक उपयुक्त ठरू शकते. ज्यांच्या पोर्टफोलिओमध्ये मध्यम आणि लहान कंपन्यांच्या फंडांचे प्रमाण जास्त आहे, त्यांनी आपल्या जोखीम क्षमतेनुसार त्याचा आढावा घ्यावा. मोठ्या कंपन्यांचे फंड, विविधीकृत समभाग फंड आणि सुरक्षित गुंतवणूक पर्याय यांचा योग्य समतोल राखणे महत्त्वाचे आहे.

किरकोळ गुंतवणूकदारांनी विदेशी गुंतवणूकदारांच्या खरेदी-विक्रीचे अनुकरण करण्याऐवजी स्वतःच्या आर्थिक उद्दिष्टांना प्राधान्य द्यावे.पुढील एक-दोन वर्षांत लागणारी रक्कम शेअर बाजारातील जोखमीपासून दूर ठेवावी. दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी नियमितता, योग्य मूल्यांकन आणि पोर्टफोलिओमधील विविधता यांवर भर द्यावा. बाजारातील तेजीचा फायदा मिळवण्याच्या घाईत चुकीच्या किमतीला समभाग खरेदी करणे टाळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

पुढील वर्षभरात कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या?

भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ, कंपन्यांच्या नफ्यातील सुधारणा आणि पायाभूत सुविधांवरील सरकारी खर्च यांमुळे शेअर बाजाराला दीर्घकालीन आधार मिळू शकतो. मजबूत आर्थिक स्थिती, मर्यादित कर्ज आणि सातत्यपूर्ण रोख प्रवाह असलेल्या कंपन्यांकडे गुंतवणूकदारांचे लक्ष राहण्याची शक्यता आहे. मात्र, जागतिक व्याजदर, भू-राजकीय तणाव आणि कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा वाढण्याचा धोका कायम आहे. त्यामुळे नोव्हेंबरमधील तेजी पुढील प्रत्येक महिन्यात कायम राहील, असे गृहीत धरणे चुकीचे ठरेल.

विमा क्षेत्रात जोखीम आधारित भांडवली आराखडा

भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने (इर्डा) विमा कंपन्यांची आर्थिक सक्षमता अधिक मजबूत करण्यासाठी जोखीम आधारित भांडवली आराखडा लागू करण्याच्या दिशेने वेगाने पावले उचलली आहेत. या नव्या प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी आणि तिला भारतीय लेखा मानकांशी सुसंगत करण्यासाठी प्राधिकरणाने २ तज्ज्ञ कार्यगटांची स्थापना केली असून, त्यांना १ महिन्यात आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



सध्याच्या नियमांनुसार विमा कंपन्यांना किमान १५० टक्के सॉल्व्हन्सी रेशो राखणे बंधनकारक आहे. नव्या प्रणालीमुळे प्रत्येक कंपनीच्या प्रत्यक्ष जोखमीनुसार भांडवलाची गरज निश्चित केली जाईल, ज्यामुळे पॉलिसीधारकांच्या पैशांना अधिक भक्कम संरक्षण मिळणार आहे आणि नाविन्यपूर्ण विमा उत्पादने बाजारात येण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. दुसरीकडे, देशभरातील न्यायालये आणि ग्राहक मंचांमध्ये २,२१,००० विमा विषयक तक्रारी प्रलंबित असल्याची गंभीर दखल घेत नियामकाने नोव्हेंबर हा महिना तक्रार निवारण महिना म्हणून जाहीर केला आहे. या प्रलंबित प्रकरणांपैकी ७२ टक्क्यांहून अधिक खटले गेल्या १ वर्षापासून प्रलंबित आहेत.

सर्व जीवन आणि सर्वसाधारण विमा कंपन्यांना जुन्या दाव्यांचा प्राधान्याने निपटारा करण्याचे, लोकपालांनी दिलेले निर्णय त्वरित लागू करण्याचे आणि लहान शहरांमध्ये विशेष शिबिरे आयोजित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय फसवणूक टाळण्यासाठी विमा प्रक्रियेत चेहरा पडताळणी तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याची आणि डिजिटल पद्धतीने कागदपत्रांची पडताळणी करण्याची सूचनाही करण्यात आली आहे. विमा ग्राहकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेत आपल्या जुन्या प्रलंबित दाव्यांबाबत संबंधित कंपनीच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करावा.

नवीन आरोग्य किंवा मुदत विमा खरेदी करताना पॉलिसीमधील उप-मर्यादा, खोलीभाड्याचे १ ते २ टक्क्यांचे निर्बंध, सह-भरणा अटी आणि पूर्व अस्तित्वात असलेल्या आजारांची माहिती स्पष्टपणे तपासून घेणे गरजेचे आहे.

ठेवीदारांना सुगीचे दिवस



रि झर्व्ह बँकेने मागील पतधोरणात रेपो दरात २५ आधार अंकांची वाढ केल्यानंतर, देशभरातील बँकांनी मुदत ठेवींवरील व्याजदर वाढवण्यास सुरुवात केली आहे. बँकिंग प्रणालीतील रोकड सुलभता कमी झाल्यामुळे आणि औद्योगिक व किरकोळ कर्जाची मागणी वाढल्यामुळे ठेवी आकर्षित करण्यासाठी बँकांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. एचडीएफसी बँक, पंजाब नॅशनल बँक, कॅनरा बँक, इंडियन ओव्हरसीज बँक आणि फेडरल बँकेने आपल्या निवडक मुदतीच्या ठेवींवरील व्याजदरांत लक्षणीय वाढ जाहीर केली आहे.

विशेषतः ४४४ दिवसांच्या आणि १८ महिने ते ३ वर्षांपर्यंतच्या विशेष मुदत ठेवींवर सर्वसामान्य ग्राहकांना ६.८५ ते ७.४० टक्के व्याज दिले जात आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी हा दर अधिक आकर्षक असून फेडरल बँकेने ज्येष्ठ नागरिकांना मिळणारा अतिरिक्त व्याज लाभ ०.६० टक्क्यांपर्यंत वाढवल्याने त्यांना ७.५० टक्क्यांपर्यंत आणि काही विशेष योजनांमध्ये ८ टक्क्यांहून अधिक प्रभावी वार्षिक परतावा मिळत आहे. मात्र, त्याच वेळी बँकांनी गृहकर्ज आणि इतर कर्जांचे व्याजदरही हळूहळू वाढवण्यास सुरुवात केल्याने कर्जदारांचा मासिक हप्ता वाढण्याचा किंवा कर्जाचा कालावधी लांबण्याचा धोका निर्माण झाला आहे.

मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करताना ठेवीदारांनी सुरक्षिततेचा आणि कर आकारणीचा नियम कटाक्षाने पाळला पाहिजे. ठेव विमा आणि पत हमी महामंडळाच्या नियमानुसार प्रत्येक बँकेत प्रति खातेदार केवळ ५,००,००० रुपयांपर्यंतच्या मुद्दल आणि व्याजालाच विमा संरक्षण असते. त्यामुळे मोठी रक्कम एकाच बँकेत ठेवण्याऐवजी वेगवेगळ्या अनुसूचित बँकांमध्ये विभागून ठेवावी. तसेच मुदत ठेवींवरील वार्षिक व्याज ४०,००० रुपयांपेक्षा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ५०,००० रुपयांपेक्षा जास्त झाल्यास बँकेकडून १० टक्के उद्गम कर कपात केली जाते, याची नोंद घेऊन योग्य नियोजन करणे शहाणपणाचे ठरते.

किरकोळ महागाईचा दर ऑक्टोबर महिन्यात ६.०९ टक्क्यांवर पोहोचल्याने आगामी काळात नव्याने व्याजदरवाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुदत ठेवींसाठी येणारा काळही सुगीचाच असेल असे तज्ज्ञांचे मत आहे. शेअर बाजारातील परताव्याच्या तुलनेत मुदतठेवींवरील व्याज कमी असते हे खरे; पण यामध्ये जोखीमही नसते. उलट हा परतावा खात्रीशीर असतो. त्याआधारे आपल्याला वर्तमानातील आणि भविष्यातील आर्थिक गोष्टींचे आराखडे तयार करण्यास मदत होते.

सोने घसरले, चांदी चमकली; गुंतवणूकदारांनी काय करावे?

आं तरराष्ट्रीय आणि देशांतर्गत कमोडिटी बाजारात चालू आठवड्यात मौल्यवान धातूंच्या प्रवाहात लक्षणीय बदल पाहायला मिळत आहेत. मल्टी कमोडिटी एक्स्चेंजवर सोन्याच्या किमतीत प्रति १० ग्रॅम १,४०,००० रुपयांच्या पातळीवरून सुमारे ७ टक्क्यांची घसरण नोंदवली गेल्याने गोल्ड ईटीएफमधील ओघ २२ टक्क्यांनी घटून ३,४७४ कोटी रुपयांवर आला आहे. याउलट, चांदीच्या ईटीएफमधील गुंतवणुकीत तब्बल ५६ टक्क्यांची मोठी उसळी नोंदवली गेली आहे. अमेरिकन डॉलरची मजबुती आणि व्याजदरांबाबतच्या अनिश्चिततेमुळे सोन्यामध्ये नफावसुली सुरू असताना, औद्योगिक मागणीच्या जोरावर चांदीकडे गुंतवणूकदारांचा ओढा वाढल्याचे ताज्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.



जानेवारी ते ऑक्टोबर या १० महिन्यांच्या कालावधीत गोल्ड ईटीएफमध्ये एकूण ४९,३९९ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक झाली असून, तिने गेल्या संपूर्ण वर्षाचा विक्रम मोडीत काढला आहे. मात्र, सणासुदीच्या काळानंतर सोन्याच्या किमतीत झालेल्या सुधारणेमुळे किरकोळ गुंतवणूकदार आता नवीन संधींच्या शोधात आहेत. चांदीचा वापर सौर ऊर्जा पॅनेल्स, इलेक्ट्रिक वाहने, सेमीकंडक्टर चिप्स आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात मोठ्या प्रमाणावर होत असल्याने, सोन्यापेक्षा चांदीमध्ये दीर्घकालीन परताव्याची अधिक क्षमता असल्याचे बाजार विश्लेषकांचे मत आहे. जागतिक स्तरावर हरित ऊर्जेकडे होणाऱ्या संक्रमणामुळे चांदीच्या पुरवठ्यावर ताण निर्माण झाला असून, खाण उत्पादनातील घट भविष्यात किमतींना मोठा आधार देऊ शकते.

या बदलत्या परिस्थितीत गुंतवणूकदारांनी भावनिक होऊन सर्व भांडवल एकाच धातूत गुंतवण्याची चूक करू नये. चांदीतील चढ-उतार हे सोन्याच्या तुलनेत अधिक तीव्र आणि वेगवान असतात, त्यामुळे अल्पकालीन नफ्याचा विचार करणाऱ्यांना मोठा फटका बसू शकतो.

मालमत्ता वितरणाच्या नियमानुसार आपल्या एकूण पोर्टफोलिओमध्ये सोने आणि चांदी यांचा एकत्रित वाटा १० ते १५ टक्क्यांपुरता मर्यादित ठेवणे हिताचे ठरते.

प्रत्यक्ष दागिने खरेदी करण्याऐवजी ईटीएफ किंवा कमोडिटी म्युच्युअल फंडांचा पर्याय निवडल्यास १० ते १८ टक्क्यांपर्यंतचा घडणावळीचा खर्च वाचतो, शुद्धतेची हमी मिळते आणि पारदर्शक बाजारभावाचा लाभ मिळतो.

जागतिक घडामोडी, अमेरिकन रोख्यांवरील उत्पन्न आणि कच्च्या तेलाच्या किमतींतील चढ-उतार लक्षात घेता एकरकमी गुंतवणुकीऐवजी टप्प्याटप्प्याने केलेली गुंतवणूकच भांडवलाचे संरक्षण करू शकते.

दीर्घकालीन भांडवली नफ्यावर करदात्यांची वाढती पावले

भा रतातील वैयक्तिक करदात्यांमध्ये समभाग आणि म्युच्युअल फंडातून मिळणाऱ्या दीर्घकालीन भांडवली नफ्याची नोंद विवरणपत्रात करण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. प्राप्तीकर विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, भांडवली नफा जाहीर करणाऱ्या करदात्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली असली, तरी एकूण वैयक्तिक करदात्यांच्या तुलनेत हा वर्ग अद्यापही लहान आहे. डिजिटल पडताळणी प्रणाली आणि वार्षिक माहिती विवरणपत्रामुळे (एआयएस) प्रत्येक गुंतवणूकदाराचे समभाग खरेदी-विक्रीचे व्यवहार थेट कर विभागाकडे नोंदवले जात आहेत. त्यामुळे नफा लपवण्याचे मार्ग बंद झाले असून करदात्यांनी स्वतःहून अचूक माहिती देण्याकडे कल वाढवला आहे.

■ नुकत्याच समोर आलेल्या प्राप्तिकर अपिलीय न्यायाधिकरणाच्या एका महत्त्वपूर्ण निकालानुसार, करदात्याकडे मोठ्या रकमेच्या मालमत्ता खरेदीचे आणि बँक ठेवींचे अधिकृत आणि कायदेशीर पुरावे असतील, तर त्यांना अनावश्यक कर आकारणीतून दिलासा मिळू शकतो. एका प्रकरणात २०,२३,००० रुपयांची मालमत्ता खरेदी आणि १३,०४,००० रुपयांच्या रोख ठेवींबाबत कर अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला होता. मात्र, करदात्याने आईच्या दागिन्यांच्या विक्रीची कागदपत्रे आणि अधिकृत बक्षीस पत्र सादर केल्यामुळे न्यायाधिकरणाने ही अतिरिक्त कर आकारणी रद्द ठरवली. यातून व्यवहारांचे कागदोपत्री पुरावे आणि नातेवाइकांमधील देवाणघेवाणीच्या नोंदी जपण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



■ सध्याच्या नियमांनुसार १ आर्थिक वर्षात समभाग आणि इक्विटी म्युच्युअल फंडातील दीर्घकालीन भांडवली नफ्यावर १,२५,००० रुपयांपर्यंत कर सवलत मिळते, तर त्यावरील नफ्यावर १२.५ टक्के दराने कर आकारला जातो. तसेच अल्पकालीन भांडवली नफ्यावरील कर दर २० टक्के करण्यात आला असल्याने गुंतवणूकदारांनी समभाग विक्रीचे नियोजन अत्यंत विचारपूर्वक करणे गरजेचे आहे. करदात्यांनी आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी आपल्या पोर्टफोलिओचा आढावा घेऊन तोटयातील समभागांची विक्री करून नफ्याशी समायोजन करण्याच्या कर संकलन नियोजनाचा वापर केल्यास कायदेशीररीत्या कराचा बोजा कमी करता येतो. सर्व बँक खात्यांचे विवरण, ब्रोकरची नफा-तोटा पत्रके आणि गुंतवणुकीच्या पावत्या किमान ८ वर्षांपर्यंत सुरक्षित ठेवणे हे कोणत्याही कर तपासणीत संरक्षण देणारे ठरते.

नगर शहरासह पाथर्डीत चेन स्नॅचिंग करणारी टोळी पकडली

४ गुन्हे आले उघडकीस, सोन्याच्या दागिन्यांसह ३.२६ लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – नगर शहरासह पाथर्डी परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून पळविणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासात उघडकीस आली आहे. त्यातील दोघांना ताब्यात घेण्यात आले असून तिघे पसार आहेत. या कारवाईत ४ चेन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले असून, पोलिसांनी सोन्याचे दागिने, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ३ लाख २६ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



केडगाव शिवारातील लिंक रोडकडून गायकेमळ्याकडे जाणार्या रस्त्यावर १ नोव्हेंबर रोजी दोन महिला स्कुटीवरून जात होत्या. यावेळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील दागिने बळजबरीने हिसकावून नेले होते. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सुचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे, अंमलदार गणेश धोत्रे, योगेश भिंगारदिवे, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, दीपक जाधव, फुरकान शेख, भगवान धुळे यांचे पथक या गुन्ह्यासह इतर चेनस्नॅचिंग गुन्ह्यांचा समांतर तपास करत होते.

पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू केला. २१ नोव्हेंबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार, विनोद उर्फ जोल्या जिजाबा भोसले (वय २६, रा. चिखली, ता. आष्टी, जि. बीड) हा केडगाव परिसरात असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने त्याला केडगाव येथून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने साथीदार सुमित नितीन चव्हाण, रोहित नितीन चव्हाण (दोघे रा. केडगाव) आणि शुभम गहिनीनाथ भोसले (रा. बेलगाव, ता. कर्जत) यांच्या मदतीने चेन स्नॅचिंगचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, पोलिसांनी अधिक चौकशी केली असता या टोळीने पाथर्डी पोलीस ठाण्यातील एक आणि कोतवाली पोलीस ठाण्यातील आणखी दोन असे एकूण तीन गुन्हे केल्याचे उघड झाले. त्यामुळे या टोळीशी संबंधित चार गुन्ह्यांची उकल झाली आहे. चोरी केलेले काही दागिने विनोद भोसले याने अंबादास दगडू पांडुळे (वय ५१, रा. चिखली, ता. आष्टी, जि. बीड) याला विक्रीसाठी दिल्याची माहिती तपासात समोर आली. त्यानुसार पोलिसांनी पांडुळे याचाही शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १८ ग्रॅमचे सोन्याचे दागिने हस्तगत केले. या प्रकरणातील सुमित चव्हाण, रोहित चव्हाण आणि शुभम भोसले हे तिघे पसार असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. ताब्यातील आरोपींना मुद्देमालासह कोतवाली पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.



गुरुवाणी – ११९

दृढ आस्था...

जिन शासनाची एक विशेषतः आहे. त्यात एखाद्या व्यक्तीची ते भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याची चर्चा करते. राजा प्रदेशीचा भूतकाळ, वर्तमान आतापर्यंत आपण पाहिला. पाप, पुण्य दोन्हीही समाप्त केले जाऊ शकतात. तीर्थंकर परमात्मा इंद्रभूती गौतमला सांगतात, राजा प्रदेशीचे देव लोकातील आयुष्य पूर्ण झाल्यानंतर तो एका अतिशय कुलीन परिवारात जन्म घेईल. त्याची आत्मा जेव्हा आईच्या गर्भात प्रवेश करेल तेव्हा तो संपूर्ण परिवार अधिक धार्मिक होईल. राजा प्रदेशीची आत्मा देवलोकातून आईच्या गर्भात आली तेव्हा संपूर्ण परिवारात धर्म कार्याचा वेगळाच माहोल तयार होतो. त्या बाळाचा जन्म झाल्यावर बाराव्या दिवशी नामकरण विधी असतो. बाळाचे वडील सांगतात, जेव्हा पासून हा जीव गर्भात आला तेव्हा पासून आमच्या धर्म साधनेत अखंड वाढ झाली आहे. म्हणून त्याचे नाव 'दृढपती' ठेवण्यात येते. धर्माप्रती दृढता कशी हवी हे छत्रपती संभाजी महाराज यांनी दाखवले. तुमचीही आचार्य गुरूदेवांप्रती अशीच दृढ भक्ती हवी. दृढताच तुम्हाला शिखरावर नेईल. दृढपती तरूण होऊन आई वडीलांना सांगून संयमाच्या मार्गावर निघतो आणि त्याला केवलज्ञान होते. नंतर मोक्ष प्राप्ती होते. आपली श्रद्धा वज्रा समान व्हावी, आस्था विचलित होणार नाही, अशीच दृढता आपल्यातही यावी हीच मनोकामना. मी प्रथमच राजा प्रदेशीचे संपूर्ण चरित्र सांगितले आहे. मी ठरवून आलो होतो की, 'मला गुरूदेवांच्या भूमीत कोणतीही कसर ठेवायची नाही'. आता गौतम निधी कार्यक्रमा विषयी बोलतो. गौतम निधी कार्यक्रम हा सशक्त व्यवस्था निर्माण करणारा आहे. प्रत्येक जैन दानी होईल असा हा कार्यक्रम आहे. त्याची वृत्ती देण्यातून आनंद मिळणारी व्हावी. इंद्रभूती गौतम स्वामींशी जोडण्याचा हा कार्यक्रम आहे. जे हात देणारे असतात ते हात कधी मागणारे बनत नाहीत. गौतम निधी सेवा, शिक्षा आणि विकासासाठी उपयोगात आणला जातो. निधीचा संग्रह न करता त्याचा साधर्मीकांसाठी विनियोग करायचा. या प्रक्रियेत मी कधीही कोणाचीही शिफारस करत नाही. आज देशात जवळपास २०० शाखा कार्यरत आहेत, याचा आनंद आहे. कार्यकर्त्यांच्या योगदानामुळे हा कार्यक्रम मोठा झाला आहे. दान देण्याची व्यवस्था निर्माण करणे हे सर्वात मोठे पुण्य आहे. म्हणून गौतम निधी कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. नगरच्या प्रत्येक घरात गौतम निधी कलश हवाच.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

हॉटेल व्यावसायिकावर मंगलगेट येथे हल्ला; सचिन जाधवसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – अहिल्यानगर शहरातील कोठला स्टँडजवळील मच्छी मार्केट परिसरात हॉटेल व्यावसायिकावर माजी नगरसेवक सचिन जाधव आणि त्याच्या साथीदारांनी हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. ही घटना १९ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास घडली असून याप्रकरणी चार जणांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिनेश दत्तात्रय खरपुडे (वय ३३, रा. गोंधळे गल्ली, माळीवाडा, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. घटनेच्या दिवशी रात्री ते अरणगाव येथून जेवण करून कोठला स्टँडजवळील वंजार गल्लीकडे जात होते. मच्छी मार्केट परिसरात पोहोचल्यावर माजी नगरसेवक सचिन जाधव आणि त्याचे साथीदार तेथे उभे होते.

माजी नगरसेवक सचिन जाधव याने खरपुडे यांना अडवून 'मेंबरसोबत राहतो म्हणून तू माजला का' असे विचारत अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. शिवीगाळ करण्यास विरोध केल्यानंतर सचिन जाधव याने त्यांना मारहाण सुरू केली. त्यानंतर सचिन जाधव याने आपल्या दुचाकीच्या डिक्कीतून चॉपरसारखे धारदार शस्त्र काढून खरपुडे यांच्यावर वार केला. हल्ल्यापासून बचाव करताना डावा हात आडवा धरल्याने त्यांच्या हाताच्या मनगटावर खोलवर जखम झाली.

या हल्ल्यात खरपुडे खाली कोसळल्यानंतर आरोपी सचिन राऊत उर्फ नफऱ्या याने त्यांना ठोसे मारले.तसेच आरोपी नितीन सुरसे आणि बंटी उर्फ स्वप्निल बेंद्रे यांनी जमिनीवर पडलेल्या खरपुडे यांच्या पाठीत दगड व विटांनी मारहाण केली.सर्व आरोपींनी मिळून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करताना माजी नगरसेवक सचिन जाधव याने 'याला संपवून टाका, मी पाहतो काय होईल ते' अशी जीवे मारण्याची धमकी दिली.

खरपुडे यांनी आरडाओरडा केल्यानंतर त्यांचे मित्र गोपाल मालपाणी आणि भैय्या थोरात यांनी धाव घेत त्यांची सुटका करून त्यांना गल्लीत नेले.सुरुवातीला जखमेवर हळद लावून रुमाल बांधण्यात आला, मात्र नंतर त्रास वाढल्याने मित्रांनी त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले व पुढील उपचारासाठी मॅकेकेअर रुग्णालयात हलवले. रुग्णालयात उपचार सुरू असताना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी सचिन जाधव सह चौघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

केडगावच्या सोनेवाडी चौकात तरुणावर धारदार वस्तूने हल्ला

नगर – केडगाव परिसरातील सोनेवाडी चौकात भरदुपारी तरुणाला मारहाण आणि धारदार वस्तूने हल्ला केल्याची घटना २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास घडली.या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तिघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी प्रतिक प्रकाश ठोकळे (वय २० वर्षे, धंदा- मजुरी, रा. समता नगर, देवीरोड, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. या आरोपींमध्ये संकेत राख (रा. शाहुनगर, केडगाव), अवि जायभाये (रा. सारसनगर) आणि आदित्य कांबळे (रा. रेल्वे स्टेशन, अहिल्यानगर) यांचा समावेश आहे.ओळखीचा आरोपी संकेत राख याने फिर्यादी प्रतिक ठोकळे यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून सोनेवाडी चौकात बोलावून घेतले. त्या वेळी तेथे उपस्थित असलेल्या अवि जायभाये याने फिर्यादीला संकेत राख याच्यासोबत बोलायचे आणि राहायचे नाही, असे सांगत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

त्यानंतर संकेत राख आणि आदित्य कांबळे यांनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही मारहाण सुरू असतानाच अवि जायभाये याने आपल्या हातातील काहीतरी धारदार वस्तूने फिर्यादीच्या डाव्या डोळ्याच्या बाजूला जोरात मारून त्यांना जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. जखमी फिर्यादीवर अहिल्यानगर येथील सिव्हिल रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. या घटनेप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तिघांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२) आणि ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गुरुवाणी – १२०

निर्ग्रंथ प्रवचन स्तुती

आज निर्ग्रंथ प्रवचन स्तुती पाठाचे विवेचन करतो.

प्रत्येक जैन व्यक्तीने हा पाठ सकाळी म्हटला पाहिजे. यात म्हटले आहे, 'मी २४ तीर्थंकरांना नमन करतो'. हे जग शाश्वत आहे. ते कोणी तयार केलेले नाही. जैन दर्शन अशा परमात्म्याला नमन करते. जगातील सर्वच जीवांना तीर्थंकरांची आस आहे. जैन धर्माचा मूळ सिद्धांत तीर्थयात्री बनण्याचा नाही तर तीर्थ बनायचा आहे. तीर्थ यात्री बनणे सोपे आहे. महाभारतात एक प्रसंग आहे. युद्ध समाप्ती नंतर पांडवांना वाटते खूप पाप झाले, या पापापासून मुक्ती मिळायला हवी. ते तीर्थ यात्रा करायचे ठरवतात व श्रीकृष्णाकडे जातात. त्यांनाही चालण्याची विनंती करतात. श्रीकृष्ण स्वतः येत नाही पण आपला प्रतिनिधी म्हणून एक कडू चवीचा भोपळा देतात व सांगतात तुम्ही तीर्थयात्रेत जिथे जाल तिथे भोपळ्यालाही स्नान करवा. पांडव यात्रेवरून परत येतात व भोपळा श्रीकृष्णाकडे घेऊन जातात. म्हणतात, आता हा भोपळा पण पावन झाला आहे. श्रीकृष्ण त्या भोपळ्याचे चूर्ण बनवतो व प्रसाद म्हणून पांडवांना देतो. भोपळा कडू लागल्याने अर्जुन, भीम थुंकुन टाकतात. मग श्रीकृष्ण म्हणतात, तीर्थयात्रा करूनही भोपळा कडूच राहिला मग तुम्ही तरी कसे सुधारले ? जो तुम्हाला ग्रेट बनवतो त्यांना तीर्थंकर म्हणतात. प्रत्येक व्यक्तीत ग्रेट बनण्याची संभावना असते. फक्त आपल्याला ग्रेट बनवणारा मिळत नाही. चंडकौशिक , अर्जुन माली यांना तीर्थंकर भेटले आणि ते ग्रेट बनले. याचे शास्त्र म्हणजे निर्ग्रंथ प्रवचन. जैन धर्माचे पूर्वीचे जे नाव होते ते होते 'निर्ग्रंथ प्रवचन'. जैन नाव खूप नंतर आले. आगममध्ये कुठेही जैन शब्द मिळणार नाही. त्यात फक्त निर्ग्रंथ प्रवचन असा शब्द आहे. ग्रंथी म्हणजे गाठ. ज्या धर्मात कोणताही विरोधाभास नाही तो म्हणजे निर्ग्रंथ प्रवचन. जैन धर्माचे सिद्धांत विज्ञानाच्या कसोटीवर मजबूत उतरले आहेत. तीर्थंकर तर मोक्षात गेले मग आताच्या काळात आपल्यासाठी कोण येणार? असा प्रश्न पडू शकतो. तीर्थंकर मोक्षात गेले पण त्यांचे जे पुण्य आहे, ते इथेच राहते. ते पुण्य ग्रहण करण्यासाठी वेगवेगळे टूल्स आहेत. ते परिपूर्ण, पूर्ण शुद्ध, न्यायप्रिय, परम शांतीचा मार्ग आहे. त्यात कोणतीही भेसळ नाही. सगळे दुःख समाप्त करण्याचा मार्ग आहे. हा सर्व अनुभूती घेण्याचा विषय आहे. तीर्थंकरांनी जो धर्म सांगितला आहे, त्याची आराधना करण्यासाठी मी स्वतःला समर्पित करतो.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

नगर - पुणे महामार्गावर एस टी बस प्रवासादरम्यान महिलेच्या बॅगेतून रोकड व महत्त्वाची कागदपत्रे लंपास

नगर – नगर – पुणे महामार्गावर एसटी बसने प्रवास करत असताना तीन अनोळखी महिलांनी वृद्ध महिलेच्या बॅगेतील रोकड आणि महत्वाची कागदपत्रे असलेले पाकीट चोरून नेल्याची घटना पारनेर तालुक्यातील सुप्या जवळील एसटी बसचा अधिकृत थांबा असलेल्या गंगासागर हॉटेलवर उघडकीस आली आहे. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंगल पोपट काटे (वय ६८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. दिघी, ता. हवेली, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २१ नोव्हेंबर रोजी त्यांच्या बहिणीसोबत पुणे–नगर रोडने एस टी बसने प्रवास करत होत्या. बस सुप्या जवळील हॉटेल गंगासागर थांबली असता तीन अनोळखी महिलांनी त्यांच्या बॅगमधील पाकीट चोरल्याचे लक्षात आले. खाली उतरून बॅग तपासली असता त्यातून ८ हजार रुपये रोख रक्कम, एसबीआयची दोन एटीएम कार्ड, बँक ऑफ बडोदाचे एक एटीएम कार्ड, सेंट्रल गव्हर्नमेंटचे सीजीएस कार्ड, कॅन्टीनचे स्मार्ट कार्ड, पॅनकार्ड, ज्येष्ठ नागरिक कार्ड आणि कपाटाच्या चाव्या चोरीस गेल्याचे आढळून आले.

या प्रकरणी मंगल काटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुपा पोलीस ठाण्यात अनोळखी ३ महिलांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खरेदीच्या बहाण्याने आलेल्या दोघांनी किराणा दुकानदार महिलेचे सोन्याचे गंठण हिसकावून पळविले; गुन्हा दाखल

नगर – किराणा खरेदी करण्याच्या बहाण्याने दुकानात आलेल्या दोघा चोरट्यांनी दुकानदार महिलेच्या गळ्यातील सुमारे अडीच तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण बळजबरीने हिसकावून नेल्याची घटना बोल्हेगाव येथील भाऊ पाटील चौकात घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविता योगेश चेमटे (वय ३८, रा. राघवेंद्र स्वामी मंदिर रोड, बोल्हेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्या भाऊ पाटील चौकात स्वतःचे स्वामी समर्थ किराणा दुकान चालवतात. त्या २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी दुकानात असताना दुचाकीवरून दोघे तेथे आले. त्यांच्या दुचाकीला नंबरप्लेट नव्हती. त्यातील एक जण दुचाकीवर रस्त्यावर थांबला, तर दुसर्याने दुकानात येऊन १७५ रूपयांचे किराणा सामान खरेदी केले आणि पैसे देऊन तेथून निघून गेला. दरम्यान, १० ते १५ मिनिटांनंतर तेच दोघे पुन्हा दुकानाजवळ आले.

एक जण दुचाकीवर थांबला, तर दुसरा सामान घेण्याच्या बहाण्याने दुकानात शिरला. फिर्यादी चेमटे या त्याला किराणा सामान देत असताना दुकानात कोणी नसल्याची खात्री करून त्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण ओढून घेतले. यावेळी चेमटे यांनी आरडाओरडा करत चोरट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो दुकानाबाहेर रस्त्यावर थांबलेल्या साथीदाराच्या दुचाकीवर बसून पसार झाला. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा चोरट्यांच्या विरोधात बीएनएस कलम ३०४ (२), ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

निंबळक बायपास रोडवरून ३ वाहनांतील डिझेलची चोरी

नगर – नगर तालुक्यातील निंबळक बायपास रोडवरील एस के वेअर हाउसेस कंपनी परिसरात ढाब्यासमोर पार्क केलेल्या तीन वाहनांमधून २७ हजार रुपये किमतीचे ३०० लिटर डिझेल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शुभम बाबुराव कोतकर (वय ३० वर्षे, रा. निंबळक, ता. जि. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. २१ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ ते ३.३० वाजण्याच्या दरम्यान निंबळक बायपास रोड, एमआयडीसी परिसरातील एस के वेअर हाउसेस कंपनीजवळ असलेल्या ढाब्यासमोर पार्किंग केलेल्या वाहनांमधून अज्ञात चोरट्याने डिझेल चोरून नेले. यामध्ये प्रत्येकी ९ हजार रुपये किमतीचे प्रत्येकी १०० लिटर डिझेल अशी (क्र.एचआर-६५-बी-२५०२), (क्र.एमपी-०९-एच-१८४१) आणि (क्र.एमपी-०९-एचएच-२३४७) या तीन वाहनांमधील एकूण ३०० लिटर (२७ हजार रुपये किमतीचे) डिझेल चोरीस गेले. या फिर्यादीवरून २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लक्झरी बसमधूनही डिझेलची चोरी

दरम्यान अशीच एक घटना श्रीगोंदा शहरातील बायपास रोड वर ही घडली आहे. या रोडवरील नायरा पेट्रोल पंपाजवळ उभ्या असलेल्या लक्झरी ट्रॅव्हल्स आणि डिझेल टँकरच्या टाक्या उघडून अज्ञात तीन चोरट्यांनी डिझेल चोरी केल्याची घटना २२ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे १.३० च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिरोज गुलाब शेख (वय ३८ वर्षे, रा. श्रीगोंदा) यांनी फिर्याद नोंदवली आहे. २२ नोव्हेंबर रोजी पहाटे बायपास रोडवरील नायरा पेट्रोल पंपाजवळ फिरोज शेख यांची लक्झरी ट्रॅव्हल्स (क्र. एमएच १६ इए ३१११) च्या डिझेल टाकीचे झाकण उघडून ११ हजार रुपये किमतीचे ९८ लिटर डिझेल चोरट्यांनी चोरून नेले. तसेच तेथील डिझेल टँकर (क्र. एमएच १६ डीएल १३५०) चीही डिझेल टाकी उघडून डिझेल चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ६२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारला थार गाडी आडवी लावून दोघांना लोखंडी रॉडने मारहाण

कारच्या काचा फोडत ५० हजार रुपयांची लूट, ६ ते ७ जणांवर गुन्हा दाखल

नगर – मारुती स्विफ्ट कारला महिंद्रा थार गाडी आडवी लावून ६ ते ७ जणांनी लोखंडी रॉडने कारच्या काचा फोडत दोघांना बेदम मारहाण केली. तसेच एकाच्या खिशातील ५० हजारांची रोकड लुटल्याची घटना नगर – जामखेड रोड वर टाकळी काझी परिसरात घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रेहान गयाझ कुरेशी (वय २५, रा. नालबंद खुंट, अहिल्यानगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्याचा सहकारी आसिफ शब्बीर कुरेशी हे नगर जामखेड रोडने जात असताना टाकळी काझी शिवारात त्यांच्या कारला महिंद्रा थार गाडी आडवी लावून त्यांना थांबविण्यात आले. त्या पाठोपाठ एक स्कॉर्पिओ गाडी आणि एक कार आली. त्यातून प्रदीप गोदाजी वारुळे (रा. दरेवाडी, ता.नगर) याच्यासह इतर सहा ते सात अनोळखी उतरले. त्यांनी लोखंडी रॉडने फिर्यादीच्या कारच्या काचा फोडून नुकसान केले.

तसेच फिर्यादी रेहान कुरेशी आसिफ कुरेशी यांना कारमधून बाहेर ओढून काढत अज्ञात कारणावरून लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. तसेच आसिफ कुरेशी याच्या खिशातून ५० हजारांची रोकड बळजबरीने काढून घेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूदही घटना १७ नोव्हेंबररोजी सकाळी ११.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत फिर्यादीने युनायटेड रुग्णालयात उपचार सुरू असताना दिलेल्या जबाबानुसार २२ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

रात्रीच्या वेळी कंटेनर आडवून चालकास मारहाण करत लुटले

नगर – रात्रीच्या वेळी कंटेनर आडवून चालकास मारहाण करत त्याच्या जवळील २० हजारांची रोकड व १० हजार रुपये किंमतीचा एक मोबाईल तीन अनोळखी चोरट्यांनी लुटल्याची घटना २१ नोव्हेंबर रोजी रात्री ९.४५ वाजण्याच्या सुमारास पारनेर तालुक्यातील वासुंदे गावच्या शिवारात पळशी गावच्या फाट्याजवळ घडली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महादेव वसंत कांबळे (वय २९ वर्षे, रा. चापोली, ता. चाकूर, जि. लातूर) हे २१ नोव्हेंबर रोजी रात्री ९.४५ वाजण्याच्या सुमारास कंटेनर (क्र. एमएच १६ डीपी ७७७५) घेऊन वासुंदे गावच्या शिवारातील पळशी फाट्याजवळून जात होते. त्यावेळी तीन अनोळखी चोरट्यांनी त्यांच्याकडील विना नंबरची पांढऱ्या रंगाची हुंदाई कंपनीची आय-२० कार कंटेनरला आडवी लावली. चोरट्यांनी कंटेनरमध्ये घुसून कांबळे यांना हाताने मारहाण केली आणि त्यांच्या कडील २० हजार रुपये रोख रक्कम तसेच १० हजार रुपये किमतीचा पांढऱ्या रंगाचा रियलमी कंपनीचा मोबाईल हँडसेट असा एकूण ३० हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने चोरून नेला.

या फिर्यादीवरून तिघा चोरट्यांच्या विरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रणजीत मारग करत आहेत.

नगरमध्ये २४ नोव्हेंबर रोजी गुरु नानकदेव जयंती सोहळा

नगर – शीख धर्माचे संस्थापक गुरू नानकदेव यांचा ५५७ वी जयंती उत्सव २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत सावेडी भुतकरवाडीतील कोठी येथील साहेती सोसायटीत होणार आहे. त्यानंतर लंगर सेवा (महाप्रसाद) दुपारी २ ते ४ या वेळात भुतकरवाडी येथील सिंधू मंगल कार्यालयात होईल. जयंती उत्सव सोहळ्यात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. दरवर्षी कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी हा सण साजरा केला जातो. गुरू नानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त धार्मिक विधी, कीर्तन आणि समाजसेवेने साजरी केली जाते.

मोकाट जनावरांचा बंदोबस्त करा

आ. संग्राम जगताप यांची मागणी; आयुक्तांची घेतली भेट



नगर– छत्रपती संभाजीनगर येथे रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेने राज्यभरात चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातही अशा प्रकारची जीवघेणी दुर्घटना घडू नये, यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. आमदार जगताप यांनी २३ नोव्हेंबर रोजी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन शहरातील मोकाट जनावरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली. मोकाट जनावरांमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत असून, रस्ते अपघातांची शक्यता वाढत आहे. त्यामुळे महापालिकेने केवळ कागदी कारवाई न करता विशेष प्रशासनाने जागे व्हावे आणि अहिल्यानगरात अशी दुर्घटना घडण्यापूर्वीच ठोस उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका या मागणीमागे असल्याचे स्पष्ट होत आहे. भाजी विक्रेत्यांनीही आपला शिल्लक भाजीपाला रस्त्यावर टाकू नये. त्यामुळे ही मोकाट जनावरे तो रस्त्यावर पडलेला भाजीपाला खाण्यासाठी रस्त्यावर येतात त्यातून ये जा करणाऱ्या नागरिकांना ही जनावरे इजा करू शकतात, असे आमदार जगताप यांनी म्हटले आहे.

मोहीम राबवून मोकाट जनावरांना पकडावे आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली.

एका निष्पाप महिलेचा जीव गेल्यानंतर तरी

पोलीस दलाचे जिल्हाभरात कोम्बिंग ऑपरेशन

अवैध धंदे, वाहतूक उल्लंघन व सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच अवैध धंदे आणि गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विशेष कोम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले. २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत चाललेल्या या मोहिमेत ४६ पोलीस अधिकारी, २०२ पोलीस अंमलदार आणि ७४ होमगार्ड यांनी सहभाग घेत विविध प्रकारची कारवाई केली.

या दरम्यान पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नाकाबंदी करून वाहन तपासणी, मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवरील कारवाई, फरार व हद्दपार आरोपींची तपासणी, नॉन बेलेबल वॉरंटची बजावणी, हिस्ट्रीशीटर व सराईत गुन्हेगारांची पडताळणी, हॉटेल व लॉजिंग तपासणी तसेच अवैध शस्त्रे व अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार राबवलेल्या मोहिमेत नाकाबंदीदरम्यान १ हजार २०० वाहनांची तपासणी करण्यात आली असून, वाहतूक नियम उल्लंघनाच्या १८ केसेस आणि ड्रंक अँड ड्राईव्हच्या १२ केसेस नोंदवण्यात आल्या आहेत.

याशिवाय हद्दपार केलेल्या ४१ आरोपींची तपासणी, ५६ नॉन बेलेबल वॉरंटची बजावणी, १५६ हॉटेल व लॉजिंगची तपासणी, सराईत गुन्हेगारांच्या वास्तव्याच्या ३८ ठिकाणांची पाहणी, ५७ सराईत गुन्हेगारांची तपासणी तसेच अवैध धंद्यांविरोधात २६ कारवाया अशा प्रकारे व्यापक मोहीम राबवण्यात आली.

भाड्याने देणे
रो-हाऊस वरील नव्याने बांधलेला
सर्व सुखसोई (अॅक्वा, गिझर, वॉशिंग मशिन पॉइंट) अटॅच कमोड संडास बाथरुम, कुटुंबासाठी सावेडी, अहिल्यानगर
9860895940

भाड्याने देणे
तपकीर गल्ली येथील व्यावसायिक दोन गाळे १२००×१२०० चे गाळे भाड्याने देणे
7276732227

पाहिजेत
गोडाऊनसाठी वॉचमन पाहिजे
*जोडपे असल्यास प्राधान्य
*वय ४० ते ५०,
*लिहिता वाचता येणे आवश्यक
*राहण्याची सोय
बोथरा ॲग्रो कोल्ड स्टोरेज
कल्याण रोड, निमगाव वाघा, अ. नगर
8975199111

पाहिजेत
सावेडी येथील जयबाबा कॉस्मेटिक्स दुकानात कामासाठी पाहिजेत.
सेल्सगर्ल्स : ३ जागा
9545381937

पाहिजेत
रजिस्टर्ड फार्मासिस्ट
(जागा- २, स्त्री)
9823787910

पाहिजेत
कापडी किराणा पिशवी शिवणे करीता कारागिर पाहिजे
9822116038

पाहिजेत
एका नामांकित कॅफेसाठी
साऊथ इंडियन कूक : ४
कॉफी मेकर : ४
7057055199, 9604388607

भाड्याने उपलब्ध
कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी मार्ग, जुना मंगळवार बाजार येथील मध्यवर्ती चौकात मोक्याचे लोकेशन उपलब्ध.
८०० चौ. फूट. तळमजल्यावरील गाळा व्यावसायिक / घरगुती वापरासाठी/ऑफिस, एजन्सी, क्लिनिक यांसाठी उपयुक्त
7770027505

भाड्याने देणे
ऑफिससाठी गाळा भाड्याने देणे आहे.
सावेडी नाका भिडे हॉस्पिटलसमोर
संपर्क- दत्तात्रय चिंतामणी
9881936148

मावशी मिळेल
घरकामासाठी व स्वयंपाक करण्यासाठी मावशी मिळेल तसेच वयोवृद्ध महिलांचे व बाळ सांभाळण्याचे काम केले जाईल. नाईट ड्युटी केली जाईल
7378706893

पाहिजेत
आमच्या फर्निचर शोरुममध्ये भरती सुरु आहे
मेहनती व जबाबदार व्यक्ती (पु)
रिसेप्शनिस्ट कम कॅशिअर
सेल्समन
सुतार / हेल्पर
अनुभव व कौशल्यानुसार पगार
विजय ट्रेडिंग कंपनी
तेलीखुंट, पॉवर हाऊस समोर, अ.नगर. मो.9881088885

पाहिजेत
मार्केटयार्ड येथे कॉस्मेटीक्स दुकानात कामासाठी
मुले पाहिजे (जागा-२)
*शिक्षण किमान १२ वी
*वय- २०, २५ वर्षे पर्यंतच
फोन अथवा भेटण्याची वेळ सायं ५ ते ७
9623685787

पाहिजेत
रुमबॉय
जागा-२
O HOTEL
सावेडी रोड, अहिल्यानगर
9881172732
8668553019
9823232599

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत
* कारागीर – ४
* हेल्पर – ६
प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी, अहिल्यानगर
9822499210
9657646555

अनुभवी मेकॅनिक पाहिजे
(जागा २)
- सर्व प्रकारच्या Motorcycles व Scooters च्या सर्व्हिसिंग व दुरुस्तीचा अनुभव
- BS6 वाहनांचा अनुभव आवश्यक
- Electric Vehicles (EV) च्या सर्व्हिसिंग व दुरुस्तीचे ज्ञान
- सर्व प्रकारच्या टू-व्हीलरची कामे करण्याचा अनुभव

-उपलब्ध सुविधा -
2 Hydraulic Ramps / Air Compressor / Battery Charger / Washing Machine
पत्ता : मनमाड रोड, यशवंत फोर्डसमोर
9422081922

डॉ पानसरे चेस्ट हॉस्पिटल
तारकपूर बस स्टॅण्डसमोर, अहिल्यानगर
जागतिक COPD दिवस
श्वास घ्या मोकळेपणाने, जगा आनंदाने!
18 नोव्हेंबर 2026 पासून 24 नोव्हेंबरपर्यंत
PFT टेस्ट मोफत
COPD (Chronic Obstructive Pulmonary Disease)
लक्षणे
* दम लागणे
* सतत खोकला
* कफ होणे
* छातीत घरघर
* थकवा येणे
* जास्त श्रमाने श्वास घ्यावला त्रास
अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी आजच संपर्क करा
मो : 9028212225
श्वास घ्या मोकळेपणाने...तपासणी करा वेळेवर...आरोग्य ठेवा उत्तम!

फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

डीटीपी ऑपरेटर पाहिजे
कोरल ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप,इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे.
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर

MY CINEMA
ॲडव्हान्स बुकिंग सुरू
AHILYANAGAR'S 1ST 5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow
Show - 23 to 25 Nov 26 RAMAYANA (2D) - 10:00 am, 2:00, 5:30, 8:15, 9:30 pm, RAMAYANA (3D)-8:45am, 12:15, 3:35, 6:55, 10:15 pm,
JIJAI (Marathi) - 12:45 pm,
AADI ANANT (Marathi) - 4:15, 7:00 pm,
CHIKEEZING (Marathi) - 11:00 am,
MAITREYYA (Marathi) - 5:30 pm,
OM OPERATION MOLE - 11:00am, 2:30, 9:00 pm, BANDHU (Marathi) - 1:30 pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 20 ते २६ नोव्हेंबर 2026
मैत्रेय (मराठी) 12:30 PM
बंधू (मराठी) 01:45 PM
जिजाई (मराठी) 04:45 PM
आधी अनंत (मराठी) 06:45 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : २० ते २६ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
SCREEN - 1 रामायण
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)
SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.00 PM 200/- (2D)
ओम चॅप्टर-१ SCREEN - 2 बंधू (मराठी)
09.00 PM 150/-
06.00 PM 150/-
आशा कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद मिळकत क्र. अ ते इ ही श्री सुनिल केवळचंद देसरडा व श्री. श्रेणिक महेंद्र दुगड दोघे रा. पुणे यांचे मालकी वहिवाटीची होती. तर अनु क्र. फ ही मिळकत श्री. सुनिल केवळचंद देसरडा यांच्या स्वतंत्र खरेदी मालकी वहिवाटीची होती. त्यांनी दोघांनी मिळुन सदर मिळकत विक्रीस काढली होती. आमचे अशिलांबरोबर त्यांचा मिळकत विक्रीचा सौदा झाला व व्यवहारापोटी आमचे अशिलाने त्यांना विसाराची रक्कम दिली. त्यांच्या संमतीने आमचे अशिलाने सदर व्यवहारास कोणाचेही हरकत असल्यास त्या बाबत वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देखील प्रसिद्ध केली होती. ठरलेल्या व्यवहारानुसार आमचे अशिल मिळकतीचे खरेदीखत करुन घेण्यास तयार होते व मोबदल्याची रक्कम देखील त्यांच्याकडे तयार होती. मात्र आमचे अशिलाबरोबरचा व्यवहार कायदेशीर रित्या अस्तित्वात असताना श्री. सुनिल केवळचंद देसरडा यांनी अनुक्रमांक अ ते इ पैकी त्यांच्या निम्म्या हिश्श्याची व अनुक्रमांक फ ही त्यांच्या स्वतंत्र मालकीच्या मिळकतीची १) कु. चारुता संजय बन्हाटे २) सौ. राणी संजय बन्हाटे ३) श्री. सतिष ज्ञानोबा कळमकर ४) श्री. वैभव महादेव बाळसराफ ५) श्री. कल्पेश सुर्यकांत भुजबळ ६) श्री. मुकेश गोरक्षनाथ भुजबळ व ७) श्री. बापु आप्पासाहेब धरणे यांना विक्री केल्याचे आमचे अशिलाचे निदर्शनास आले. तसेच श्रेणिक महेंद्र दुगड हे देखील सदर मिळकतीपैकी त्यांच्या हिश्श्याची मिळकत आमचे अशिलास खरेदी देण्याचे कामी टाळाटाळ करत असल्याचे आमचे अशिलाचे निदर्शनास आले. त्यामुळे आमचे अशिलाने सदर बेकायदेशीर खरेदी व्यवहार रद्द करून मिळण्याकरिता. सदर संपुर्ण मिळकतीचे खरेदीखत करून मिळण्याकरिता व इतर बाबी मिळण्याकरिता मा. दिवाणी न्यायालयात स्पेशु. नं. २८२/२०२६ चा दावा केला असुन सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित आहे. सदर दाव्याची सर्व संबंधितांना माहिती झाल्यामुळे ते मिळकतीमधील आमचे अशिलाचे कायदेशीर हक्कात बाधा निर्माण करण्याच्या गैरहेतुने मिळकतीचे हस्तांतरण करण्याच्या व त्या मध्ये तिऱ्हाईत इसमाचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमचे अशिलाचे निदर्शनास आले आहे. म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली परिशिष्टामध्ये नमुद मिळकतीबाबत कु. चारुता संजय बन्हाटे वगैरे यांचे बरोबर कोणीही कसल्याही प्रकारच्या हस्तांतरणाचा व्यवहार करू नये केल्यास तो सदर मिळकतीमधील आमचे अशिलाचे हक्क हितसंबंधावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे.

मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट):- डी. अहिल्यानगर सब डी।। तालुका पैकी मौजे पिंपळगाव कौडा येथील शेतजमीन अ) गट नं. १३७ याचे क्षेत्र १ हे. ८२ आर पैकी १ हे. ४२ आर, ब) गट नं. १४१/२ याचे क्षेत्र ५ हे. ६० आर ही संपुर्ण जमीन, क) गट नं. १४२/२ याचे क्षेत्र हे. ८५ आर ही संपुर्ण जमीन, ड) गट नं. १४२/१ याचे क्षेत्र ११ हे. ५७ आर पैकी दक्षिण पश्चिम कोपऱ्यातील क्षेत्र २ हे. ६५ आर, इ) गट नं. १४२/१ याचे क्षेत्र ११ हे. ५७ आर पैकी पूर्व- दक्षिण कोपऱ्यातील क्षेत्र १ हे. २० आर, फ) गट नं. १४१/१ याचे क्षेत्र २ हे. ८५ आर पैकी ० हे. ४० आर येणेप्रमाणे जमिन मिळकती त्यातील तदंगभुत वस्तुसहित

ॲड. सिद्धेश प्रमोद मेहेर
४,गोवर्धन अपार्टमेंट, अहिल्यानगर मो-९३७३३६३५३६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे नमूद विद्यमान मालक **सौ. सोनाली जयराम बेरड रा.निंबोडी ता. जि. अहिल्यानगर** हे असून, सदर मिळकत त्यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतींचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला आहे. खालील नमूद प्लॉट नंबर २१ ते २६ या प्लॉट मिळकतीवर भिंगार अर्बन को ऑप बँक लि.या बँकेचा बोजा असून व्यतिरिक्त सदरच्या मिळकती ह्या निर्वेध, निर्जोखीम व बोजा विहित तसेच सदर मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तॉंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच १० (दहा) दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे गृहित धरुन व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :- अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे नागरदेवळे. ता.जि.अहिल्यानगर** येथील सर्व्हे नंबर १९७/२९८/१ मधील बिनशेती प्लॉट मिळकती खालीलप्रमाणे-

अ.क्र	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ चौरस मीटर	चतुःसिमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१.	११	१२५.००	प्लॉट नंबर १८	प्लॉट नंबर १२	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर १०
२.	२१	२१४.०३	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २२	९.०० मी.रस्ता	१५.०० मी.रस्ता
३.	२२	६८.५३	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २३	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २१
४.	२३	५१.२१	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २४	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २२
५.	२४	५२.३७	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २५	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २३
६.	२५	५२.५३	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २६	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २४
७.	२६	५४.६८	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २७	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २५
८.	२७	५५.८४	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २८	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २६
९.	२८	५७.००	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर २९	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २७
१०.	२९	५८.१६	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर ३०	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २८
११.	३०	५९.३१	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर ३१	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर २९
१२.	३१	६०.४७	स.नं.२९७ पैकी	प्लॉट नंबर ३२	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर ३०
१३.	३२	१४७.१८	स.नं.२९७ पैकी	९.०० मी.रस्ता	९.०० मी.रस्ता	प्लॉट नंबर ३१

येणेप्रमाणे चतुःसिमा पूर्वक बिनशेती प्लॉट मिळकती यामधील वहिवाटीच्या, वागणुकीच्या हक्कासह काही एक राखून न ठेविता असे. दि.२३/११/२०२६

ॲड.सचिन चंद्रकांत फुलसौंदर
ऑफिस : तळमजला, आनंद हाईट्स, जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर, मो : ९९२२२२७१७८

जाहीर नोटीसीला उत्तर

तमाम लोकांस व विशेषत: श्री. कनुभाई अंबालाल पटेल व त्यांचे कुटुंबीय ज्यांचे नाव नोटीसीत आहे त्यांना जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की, दि.०६/११/२०२६ चे दैनिक नवामराठा वृत्तपत्रात ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरिश्चंद्रे व ॲड ओंकार पंडित मोरे, ऑफिस महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर यांनी श्री. कनुभाई आंबालाल पटेल व इतर ११ यांचे तर्फे टायटल व्हेरीफिकेशन नोटीस प्रसिध्द केली. सदर नोटीस आमचे आशिल श्री. सुनिल तात्याभाऊ तुबे व इतर ५ रा. केडगांव, ता. नगर यांचे वाचनास आली त्यास आमचे आशिलातर्फे उत्तर देण्यात येते की,

सदर नोटीसीतील बहुतांश मजकुर खरा नाही व मान्य नाही. मौजे केडगांव येथील स.नं. १८८ चे क्षेत्र ४ हे. ३५ आर या संपूर्ण जमिनीत आमचे आशिलाचे आजोबा श्री.पिरा दुबे कुळ होते व वहित करत होते. सदर जमिनीपैकी २ हे. १० आर जमिन श्री.मगनभाई अंबालाल पटेल वगैरे ६ यांनी आमचे आशिलाचे आजोबा यांना विकली व कुळाला ताबा मालकी हक्काचा झाला. मात्र उरलेली जमिन क्षेत्र २ हे. २५ आर आमचे आशिलाचे प्रत्यक्ष ताब्यातच राहिली व पटेल बंधु यांचा ताबा त्यावर नव्हता आजही स.नं.१८८/१चे क्षेत्र २ हे.१० आर वारसा हक्काने आमचे आशिलाचे प्रत्यक्ष ताब्यात आहे.आमचे आशिल त्यात अनेक वर्षापासुन सलग पीके घेत असून आजही त्या क्षेत्रावर ज्वारी व करडीचे पीक आमचे आशिलाचे उभे आहे. त्या जमिनीलगतच आमचे आशिलाचे मालकीचा स.नं.१८८/३ आहे.अनेक वर्षाचे वहिवाटीने आमचे आशिलास सदर स.नं.१८८/१ या जमिनीवर हक्क हितसंबंध व ताबा याचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्यामुळे कोणीही सदर स. नं. १८८/१ चे क्षेत्र २ हे. १८ आर या बाबत श्री. पटेल कुटुंबीयाबरोबर कोणताही खरेदी, करार, ई व्यवहार करु नये केल्यास तो बेकायदेशीर होईल व त्याची कायदेशीर जोखमी व्यवहार करणाऱ्यावर राहिल.

आमचे आशिलाचा सदर स. नं. १८८/१ या जमिनीवर अग्रहक्क असून आमचे आशिल ही सदर जमिनी विकत घेण्यास तयार आहेत यांची नोंद घ्यावी. कळावे,
अहिल्यानगर, २३/११/२०२६

ॲड. जी. आर. गिरीकर
९३१, कोर्ट गल्ली, अहिल्यानगर

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार ठरल्याबरोबर तारीख १०/१०/२०२६ रोजी दैनिक नवा मराठा मध्ये जमिनी बाबत नोटिस दिलेली होती व त्यानंतर जागा मालकाने ठरल्याप्रमाणे बिगरशेती आदेश घेऊन अंतिम ले-आऊट मंजूर करून घेतलेला आहे व प्लॉट वाईज खालीलप्रमाणे ७/१२ हि तयार झाले आहेत.

इतपत कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून खालीलप्रमाणे प्लॉट मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच होणार आहे. परंतु त्यापूर्वी ले-आऊट मंजूरीस कोणा वारसाची अथवा हितसंबंधी व्यक्तीची हरकत असल्यास संबंधितांनी हि जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर योग्य त्या कागद पत्रांच्या नकालांसह समक्ष कार्यालयीन वेळेमध्ये लेखी स्वरुपात कळवावे.

सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. २३/११/२०२६

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन : जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, मौजे सावेडी येथील नगर-मनमाड रोड वरील संजोग हॉटेल मागील सर्व्हे नंबर २५२/४ड/४इ मधील बिगरशेती प्लॉट चे वर्णन खालीलप्रमाणे

प्लॉट नंबर	क्षेत्रफळ चौ. मी.	चतु:सिमा			
		पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२९०.९५ हा संपुर्ण प्लॉट	प्लॉट नंबर २	लागु प्लॉट नंबर	लागु सर्व्हे नंबर	९.०० मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता
२	२८९.९४ हा संपुर्ण प्लॉट	प्लॉट नंबर ३ व ४	लागु प्लॉट नंबर	प्लॉट नंबर १	९.०० मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता
३	१९६.९८ हा संपुर्ण प्लॉट	९.०० मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता	प्लॉट नंबर ४	प्लॉट नंबर २	९.०० मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता
४	१८३.३९ हा संपुर्ण प्लॉट	९.०० मीटर रुंदीचा अंतर्गत रस्ता	लागु प्लॉट नंबर	प्लॉट नंबर २	प्लॉट नंबर ३

विद्यमान मालकांचे नाव
१. श्री.महेश बाळासाहेब वाकळे २. श्री.संदीप दत्तात्रय वाकळे ३.श्री सतीश दत्तात्रय वाकळे सर्व रा. लक्ष्मी सदन, वाकळे पाटील फॉर्म हाऊस, सावेडी, अहिल्यानगर ४१४००१

ॲड. आर. टी. शर्मा
ॲड. अंकिता अनिल शर्मा (पगारिया)
पत्ता- ऑफीस नं. १४,१७ पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर. मो. ९४२२२२०८४५,

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली मिळकत या विद्यमान मालक **दिलीप फुलचंद कटारिया रा. सिध्दीविनायक सोसायटी. रेणावीकर शाळेजवळ, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. विद्यमान मालक यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी विसारापोटी आमचे आशिलाकडून रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे आशिलास खरेदी देण्याचे ठरवले असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (७) दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणून दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन :- डि ।। अहिल्यानगर सब डि।। ता. नगर अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं. २४/२ब/१ मधील प्लॉट नं. २३ याचे क्षेत्र २१२.५० चौ. मी. (७/१२ उताऱ्याप्रमाणे २.१२.५० आर.चौ.मी.) व त्यावरील बांधकाम क्षेत्रफळ ७२.३१ चौ. मी. ही संपूर्ण मिळकत.**

यांसी चतु:सिमा
पुर्वेस :- ९ मी. रुंदीचा रस्ता,दक्षिणेस :- स.नं. २८१,
पश्चिमेस :- प्लॉट नं. २२, उत्तरेस :- ६ मी. रुंदीचा रस्ता,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

ॲड.सुनिल गोरक्षनाथ हरिश्चंद्रे,
ॲड.ओंकार पंडित मोरे
ऑफिस : गाळा नं.४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर, मो : ९८६०६४६४६३,
अहिल्यानगर
दि. : २३/११/२०२६

Career Ki Shuruvat DISHA ke saath
MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE
दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टॅंड जेजारी. अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रचा गार्डन बिल्डिंग, मिलकाश चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्वग व
अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९७२८२७१९८८